आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range...
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. ०१.०९.२०२५ | अंक नं. १३० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

किमान 20% किंवा
जेवढ्या वजनाचा सोन्याचा दागिना..
तेवढी टक्के मजुरीत सूट..
उत्सव मजुरीचा
ऑफर 27 ऑगस्ट ते 21 सप्टेंबर 2025 पर्यंत वैध
योजनेचा नियम : सोन्याचा प्रती एक दागिना व हजर स्टॉकवर लागू.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

# ‘मराठा आरक्षणासाठी’चे आंदोलन हाताबाहेर गेलंय... मुंबईत आता कोणालाही येऊ देऊ नका : उच्च न्यायालय

## सीएसएमटी, फ्लोरा फाऊंटन, दक्षिण मुंबईतील आंदोलकांना हटविण्याच्या सरकारला सूचना; २ सप्टेंबरला पुन्हा सुनावणी

मुंबई – मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदानात सुरु असलेल्या आंदोलनाच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात अ‍ॅड. गुणरत्न सदावर्ते यांच्यासह एमी फौंडेशन व इतरांनी याचिका दाखल केल्या असून, त्याच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने राज्य सरकारसह हुल्लडबाजी करणाऱ्या आंदोलकांवर ताशेरे ओढले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, फ्लोरा फाऊंटन व दक्षिण मुंबईत असलेल्या आंदोलकांना तेथून तातडीने हटविण्याचे निर्देश न्यायालयाने १ सप्टेंबर रोजी झालेल्या सुनावणीत राज्य सरकारला दिले आहेत. या याचिकेवर २ सप्टेंबर रोजी पुन्हा सुनावणी होणार आहे.

अ‍ॅड. गुणरत्न सदावर्ते यांनी आझाद मैदानात सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनाविरुद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. मनोज जरांगे पाटील आणि वीरेंद्र पाटील यांनी आदेशाचे उल्लंघन केल्याचा दावा याचिकाकर्त्यांने कोर्टात केला आहे. आंदोलकांकडून देखील उच्च न्यायालयात बाजू मांडण्यात आली असून, कैलास खांडबहाले यांच्याकडून हस्तक्षेप याचिका दाखल करण्यात आली आहे. दरम्यान, न्यायालयाने काही निरीक्षण नोंदवले असून मुंबईतील आंदोलन हाताबाहेर गेले, आता मुंबईत कोणालाही येऊ देऊ नका, अशा सूचना न्यायालयाने राज्य सरकारला दिल्या आहेत.

मुंबईत संपूर्ण उच्च न्यायालय परिसराला घेराव घालण्यात आला आहे. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या गाड्या अडवण्यात आल्या आहेत, त्यांना उच्च न्यायालयात येण्यापासून अडवण्यात आल्याच न्यायमूर्तींकडून स्वतः सांगण्यात आले. तसेच, मुंबईत अजून आंदोलनकर्ते येत आहेत, त्यांना कसे अडवणार, अशी विचारणाही मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला केली आहे. न्यायालयाने आजच्या सुनावणी राज्य सरकारला चांगलेच सुनावले. दरम्यान, सुनावणीदरम्यान न्यायालयाच्या बाहेर मराठा आंदोलक अनेक ठिकाणी उभे असल्याचेही पाहायला मिळाले. एमी फाऊंडेशनने दाखल केलेल्या याचिकेत मुंबई उच्च न्यायालयाने अंतरिम आदेश दिले होते. मात्र, त्या आदेशाच उल्लंघन झाल्याचे याचिकाकर्त्यांकडून न्यायालयात सांगण्यात आले. मनोज जरांगे पाटील आणि वीरेंद्र पाटील यांनी आदेशाचे उल्लंघन केल्याचा दावा याचिकाकर्त्यांने केला आहे. तर, आंदोलकांनी मुंबई अडवून ठेवली असल्याचा दावा अ‍ॅड. गुणरत्न सदावर्ते यांनी कोर्टात केला आहे. आझाद मैदान पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी श्रीकांत अडाते हेही उच्च न्यायालयात उपस्थित होते. दरम्यान, आंदोलकांकडून देखील आज उच्च न्यायालयात बाजू मांडण्यात आली असून कैलास खांडबहाले यांच्याकडून हस्तक्षेप याचिका दाखल करण्यात आली आहे.

### उच्च न्यायालयाची सरकारला विचारणा

मुंबई उच्च न्यायालयाने न्यायालयात मनोज जरांगे पाटील यांचा अर्ज वाचून दाखवला. या अर्जाच्या सुरुवातीलाच आमरण उपोषणाचा उल्लेख आहे. मात्र, नियमात आमरण उपोषणाला परवानगी नसल्याने उच्च न्यायालयाने राज्य सरकारला विचारणा केली आहे. अर्जाच्या खाली जरांगे पाटील यांची सही असल्याचे तुम्ही सांगू शकता का? मनोज जरांगे पाटील यांना नोटीस बजावण्यात आली आहे का? अशीही विचारणा मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला केली आहे. गेल्या सुनावणीत नोटीस बजावण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले होते.

### आंदोलकांकडून नियम व अटींचे उल्लंघन

केवळ आझाद मैदानात आंदोलनाची परवानगी देण्यात आल्याचा दावा याचिकाकर्त्यांने केला आहे. तसेच, दुसरीकडे आंदोलन करण्यास परवानगी नाही, परवानगी फक्त एका दिवसासाठी देण्यात आली होती, अशी बाजू राज्य सरकारने मांडली. आंदोलकांकडून लिहून देताना सगळ्या अटी पाळण्यात येतील असे मान्य केले होते, त्याआधारे परवानगी देण्यात आली होती अशी माहिती महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी न्यायालयात दिली. कोर्टाने नियमात राहून आंदोलन करण्याची परवानगी दिली होती, आझाद मैदान हे आंदोलनासाठी आरक्षित आहे. मात्र, त्याव्यतिरिक्त कुठेही आंदोलन करण्यास परवानगी नाही, असेही सरकारने म्हटले आहे.





पुरुषांसाठी ब्रॅण्डेड शर्ट


(3XL, 4XL पर्यंत) Rs.550/- ला 1 Rs.1500/- ला 3
(2XL, 3XL, 4XL पर्यंत) Rs.400/- ला 1 Rs.1200/- ला 3
जिन्स व फॉर्मल पॅन्ट साईज ३४ पर्यंत Rs.1200/- ला 3 व साईज 36 पासून पुढे Rs.1500/- ला 3, मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
पुरुषांसाठी सर्व काही
शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त प्रमाणपत्र
१० वी मध्ये कमी मार्क मिळाले किंवा १२ वी मध्ये नापास झालात ? वैद्यकिय क्षेत्रात करियर करायाच होत ? पण आता काय करु ?
मग वैद्यकियसारखे दुसरे कुठले क्षेत्र आहे ?
निराश होऊ नका... निमवैद्यकिय क्षेत्रात सुवर्ण संधी...
नर्सिंग ची कास धरा... बेरोजगार मात करा...
शासकिय नोकरीची पात्रता व हमी असलेले कोर्सेस
दर्जेदार शिक्षण | प्रवेश सूचना | दर्जेदार नोकरी
नर्सिंग कोर्सेस (मुला-मुलींसाठी)
नर्सिंग केअर - आरोग्य सेवक • कालावधी : १ वर्ष • माध्यम मराठी/इंग्रजी
हे कोर्स उत्तीर्ण झाल्यावर जिल्हा परिषद, नगर पालिका, महानगर पालिका, बी.अ‍ॅण्ड सी, मलेरिया व इतर शासकिय विभागात आरोग्य सेवक पदावर शासकीय नोकरीची संधी सन २००८ ते २०२५ पर्यंत या पदासाठी संपुर्ण महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेत व इतर शासकीय ठिकाणी आरोग्य सेवक पदावर (स्केल- ९३००-३४, ८०० ग्रेड पे ५६०० प्रमाणे वेतन मिळते.) भरती प्रक्रिया झाली आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत शासकीय नोकरीची संधी. तसेच निमशासकीय, मल्टिस्पेशालिटी व सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये नोकरीची सुवर्ण संधी !
ऑपरेशन थिएटर असिस्टंट/टॅक्नीशियन कोर्स : • कालावधी : १ वर्ष • माध्यम मराठी/इंग्रजी
२०१० ते २०२५ पर्यंत हे कोर्स उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सेंट्रल गव्हर्नमेंटच्या ESIC Model Hospital मध्ये O.T. Asst./Tech. पदावर नेमणुक झाली आहे व संस्थेच्या विद्यार्थ्यांना नोकरी मिळाली आहे व AIMS हॉस्पिटल मुंबई येथे जून २०१५-२५ पर्यंत भरती प्रक्रिया झाली आहे. (स्केल रु. ९३००-३४, ८०० ग्रेड पे ५६००)तसेच शासकीय, निमशासकीय, खाजगी, मल्टीस्पेशालिटी व सुपरस्पेशालिट हॉस्पिटलमध्ये नोकरी मिळाली आहे. तसेच नोकरी मिळवण्याची सुवर्णसंधी.
वयाची अट नाही... त्वरा करा... मर्यादित जागा...
३१ वर्षाची यशस्वी शैक्षणिक परंपरा असलेले सुसज्ज कॉलेज
उपरोक्त सर्व पदांसाठी मागणी जास्त व उमेदवार कमी असल्यामुळे नोकरीची १००% संधी
J.J.M.F. JIVAN JYOT MEDICAL FOUNDATION
बॉम्बे हॉस्पिटल बिल्डिंग,वन विभाग कार्यालय मागे,नगर-छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर.मो.-8830685732


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यांत येते की, आमचे अशिल **श्री दिगंबर मारूती साळुंके** यांचे पुर्वज नामे **कै. भवानी साळुंके उर्फ घिसाडी. कै. भैरू (बहिरू) भवानी साळुंके उर्फ घिसाडी व कै. मारूती भैरू साळुंके उर्फ घिसाडी** यांच्या मालकीच्या मिळकती अहिल्यानगर (अहमदनगर) येथील कॅन्टोन्मेंट क्षेत्र, नगर-औरंगाबाद रोड, कोठला, सावेडी, मंगलगेट, कोंडीमामा चौक, माळीवाडा, केडगाव, नालेगाव, राहुरी - घोडेगाव रोड व इतर ठिकाणी, तसेच पुणे जिल्ह्यातील शिरूर या गावामध्ये असून सदरील मिळकतींमध्ये आमचे अशिलांचा अविभक्त हिस्सा आहे. सदरील मिळकती खालील फोटोंमध्ये दर्शविलेले इसम नामे १) श्री. वसंत सहादू साळुंके, २) श्री.सुरेश सहादू साळुंके, ३) श्री.चंद्रशेखर किसन साळुंके व ४) श्री.नितीन किसन साळुंके परस्पर खोट्यानाट्या कागदपत्रांच्या आधारे एकटे मालक असल्याचे भासवून हडप व गिळंकृत करून तिऱ्हाईत इसमांची दिशाभूल करून आमचे अशिलांचे परस्पर हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहेत. **त्याकामी आमचे अशिलांनी सदर इसमांविरूद्ध पोलिसांत फिर्याद अर्ज दिला होता. सदर प्रकरणी सदर फोटोंमध्ये दर्शविलेले इसम पोलीस स्टेशनमध्ये हजर होऊन त्यांनी सदर मिळकतींबाबत कुठलाही व्यवहार केला नसल्याचा पोलीसांना जबाब दिला आहे. या उपर सदर मिळकतींबाबत खालील इसमांशी कोणीही कुठलाही व्यवहार केला असल्यास सदरचा व्यवहार हा मूळत: बेकायदेशीर राहिल.** त्यामुळे खालील इसमांशी कोणीही करार, मदार, दान, गहाण, लिज, लिन, ट्रान्स्फर, खरेदी-विक्री, कुलमुखत्यारपत्र, विकसनकरारनामा इत्यादी करू नये. जर कोणी वरील इसमांशी आमचे अशिलांचे संमतीशिवाय कुठलाही व्यवहार व करारमदार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व सदरचा व्यवहार बेकादेशीर व रद्द समजण्यात येईल. सबब सदरील जाहीर नाटीस दिली असे.

अहिल्यानगर.
दि. ३०/०८/२०२५

**अ‍ॅड.मयूर दिगंबर साळुंके**
फ्लॅट नं. ८, सत्यराज क्लासिक बिल्डींग, सिटीएस २८९, शुक्रवारपेठ, पुणे-४११००२, मोबाईल ९१५८८७४७३९


श्री.सुरेश सहादू साळुंके


श्री.नितीन किसन साळुंके


श्री.चंद्रशेखर किसन साळुंके


श्री.वसंत सहादू साळुंके

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine) DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* डोकेदुखी, मायग्रेन
* फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे
* व्हर्टिगो, चक्कर येणे
* अर्धांगवायू, पॅरेलीसीस
* विसराळूपणा
* थरथर सुटणे, पार्किन्सन
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध. * सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कास्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
9257575718
9764416136

Member of CREDAI
आमच्या हक्काच्या घराचं स्वप्न साकार झालं..


10.10 लाखापासुन*
1&2 BHK व टेरेस फ्लॅटही उपलब्ध.
11,000/- बुकिंग रक्कम
आकर्षक व दर्जेदार वास्तुशास्त्रानुसार बांधकाम
एमआयडीसी लगत आपल्या हक्काच्या घराचा भव्य प्रकल्प..
नामांकित बँकेतुन गृहकर्ज उपलब्ध
रेरा अंतर्गत रजिस्टर्ड प्रोजेक्ट
PMAY 2.0 SUBSIDY 1.80 Lacs.
स्वप्न साकार
प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घेता येणे शक्य.
मोरया पार्क जवळ, जिमखाना रोड, बोल्हेगांव, ता.जि. अहिल्यानगर
RERA REG NO. P52200026150
बुकिंगसाठी संपर्क : 70 3000 1006/7

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# स्वायत्तता टिकली तरच लोकशाही ही टिकेल

## न्या. उज्ज्वल भुयान यांचे प्रतिपादन; सेंट्रल ॲडव्होकेट असोसिएशनची व्याख्यानमाला



जिल्हा न्यायालयाच्या द्विशताब्दी महोत्सवपूर्ती निमित्त सेंट्रल ॲडव्होकेट बार असोसिएशनच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांनी मार्गदर्शन केले.

नगर - राज्यघटना हे न्यायव्यवस्थेचे अधिष्ठान असून न्यायालय ही घटनात्मक संस्था आहे. या न्यायव्यवस्थेने आत्तापर्यंत लोकशाही मजबूत करणारे न्यायनिवाडे दिले आहेत. न्यायालयाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची जबाबदारी न्यायाधीशांबरोबरच वकील व सत्ताधाऱ्यांची आहे. ही स्वायत्तता लोकशाही टिकवेल असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांनी केले.

अहमदनगर सेंट्रल ॲडव्होकेट बार असोसिएशनच्या वतीने जिल्हा न्यायालय स्थापनेच्या द्विशताब्दी महोत्सवपूर्तीच्या व्याख्यानमालेत त्यांनी 'कोर्टाच्या माध्यमातून लोकशाहीचे मजबुतीकरण' या विषयावर आपले विचार मांडले. याप्रसंगी सौ. संघमित्रा भुयान, मुंबई उच्च न्यायालयातील जिल्ह्याचे पालक न्यायाधीश श्रीमती विभा कंकणवाडी, न्या. रोहित जोशी, प्रधान जिल्हा न्यायाधीश श्रीमती अंजू शेंडे, जिल्ह्यातील सर्व न्यायाधीश, जिल्हा पोलीस प्रमुख सोमनाथ घारगे, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा सहकारी वकील एस. के. पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

न्यायप्रक्रिया गतिमान करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने कृती आराखडा राबविण्याचे निर्देश जिल्हा स्तरावर दिले असून पंधरा वर्षांहून अधिक प्रलंबित खटले प्राधान्याने निकाली काढण्यात येत आहेत. न्यायनिवाडा त्वरित मिळावा अशी अपेक्षा करणाऱ्यांना त्यांनी ही काय वनडे किंवा वीस-बाय-वीस क्रिकेट मॅच नाही, खटल्यातील गुण-अवगुणांचा न्यायाधीशाना परामर्श घ्यावा लागतो, असे सुनावले. सर्वोच्च न्यायालय लोकशाही रक्षणासाठी मुक्त व स्वतंत्र न्यायव्यवस्था संविधानाच्या संरक्षकांची भूमिका पार पाडीत असून संसदेने राज्यघटनेच्या मर्यादा ओलांडण्याचा केलेला प्रयत्न सर्वोच्च न्यायालयाने लोकांच्या अधिकारांद्वारे वेळीच प्रतिबंध केला. हे त्यांनी विविध खटल्यांचा संदर्भ देऊन स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी बजावलेल्या कठोर न्यायदानाचा त्यांनी गौरव केला ज्येष्ठ विधिज्ञांचा सत्कार करताना आपल्या वडिलांच्या वकिलीच्या सुवर्ण महोत्सवी सन्मानाचा प्रसंग सांगताना ते गहिवरून आले.

या सोहळ्यात ७५ वर्षे ओलांडलेल्या ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. एस. एच. काकणी, एस. बी. पलोड, अच्युतराव चौधरी, अशोक कोठारी, राधाकृष्ण पुलाटे, ए. के. गुगळे, विश्वासराव आठरे, अच्युतराव पिंगळे, ए. एस. गांधी, आय. पी. काझी, जगदीश खंडेलवाल, अशोक झरकर व न्यायदानात प्राविण्य मिळवणारे मुंबईचे ॲड. प्रमोद जोशी, नितीन गवारे, किशोर पाटील आदींचा सन्मान करण्यात आला.

न्यायमूर्ती रोहित जोशी यांनी आत्मविश्वास, मनाची दृढता, कठोर परिश्रम, धैर्य व प्रयत्नातील सातत्यता या पंचसूत्रांचे पालन केल्यास जीवनात यशस्वी होता येते, असे सांगितले. न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी यांनी राज्यघटनेविषयी संवेदनशील राहण्याची प्रेरणा अशा व्याख्यान-मालांमधून मिळते, कायद्याचे पालन हे संस्कृतीचा अविभाज्य भाग असून त्यामुळे भारतीय संस्कृती महान होईल, असे सांगितले.

जिल्हा प्रधान न्यायाधीश श्रीमती अंजू शेंडे यांनी वकिलांतून न्यायाधीश घडतात. व्याख्यान-मालेतील ज्ञानाची पर्वणी नव्या पिढीला संजीवनी देणारी आहे. कायद्यातील तरतुदींचा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत लाभ झाला पाहिजे, असे सांगितले.

सेंट्रल ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अशोक कोठारी यांनी स्वागतपर भाषणात जिल्हा न्यायदान प्रक्रियेतील ऐतिहासिक थोर उज्ज्वल परंपरेचे योगदान अधोरेखित करून व्याख्यानमालेतून मिळणाऱ्या ज्ञानाचा अनुभव नव्या पिढीस प्रेरक ठरून 'सर्वांसाठी न्याय' या संकल्पनेप्रमाणे न्यायदान प्रक्रियेस गती मिळत असल्याचा विश्वास व्यक्त केला. श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या स्वागतगीताने व न्यायदीप प्रज्वलनाने सोहळ्याची सुरुवात झाली. असोसिएशनचे सचिव ॲड. योगेश काळे यांनी आभार मानले.

प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले. पसायदानाने सांगता झाली. जिल्ह्यातील विविध न्यायालयातील न्यायाधीश, वकील, कायदे अभ्यासक उपस्थित होते.

# विनापरवाना घोडागाडी शर्यत भरविल्याने चौघा आयोजकांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - नगर तालुक्यातील नारायणडोह गावच्या शिवारात वाळुंज बायपास ते सारोळा बद्धी बायपास दरम्यात कुठलीही परवानगी न घेता घोडागाडी (टांगे) शर्यत भरविल्या प्रकरणी चौघा आयोजकांवर नगर तालुका पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

आयोजक करण युवराज बेरड, अजय विलास जाधव, मनोज बारस्कर, शिवा राऊत (पूर्ण नाव व पत्ता माहित नाही) यांनी ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास नगर तालुक्यातील नारायणडोह गावच्या शिवारात वाळुंज बायपास ते सारोळा बद्धी बायपास दरम्यात ही घोडा गाडी शर्यत भरविली होती. यात २० ते २५ घोडा गाड्या, १०० ते १५० पशुपालक तसेच ही शर्यत पाहण्यासाठी अनेक लोकांची गर्दी झाली होती. या गर्दीत शर्यत पुकारून रस्त्यावरून घोडा गाड्या पळविल्या, त्यावेळी या गाड्यांमध्ये बसलेले गाडा चालक हे घोड्यांना चाबकाने मारून त्यांना क्रूरतेची वागणूक देत होते. तसेच या शर्यतीमुळे रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहनचालकांची अडचण झाली. ही माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांचे पथक तेथे गेले. त्यांनी आयोजकांना शर्यतीच्या परवानगी बाबत विचारणा केली असता, त्यांनी कुठलीही परवानगी घेतली नसल्याचे समोर आले. त्यामुळे पो.कॉ.रमेश शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आयोजकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शहरातील हजरत घोंडे पीर दर्गा प्रकरणी पुनर्बांधणीसाठी तातडीने परवानगी द्यावी

## समाजकंटकांवर कारवाई करा : निवेदनाद्वारे मागणी



हजरत घोडे पीर दर्गा प्रकरणी पुनर्बांधणीसाठी तातडीने परवानगी देवून समाजकंटकांवर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन खासदार शरदचंद्र पवार यांना देताना अलतमश जरीवाला आदी.

नगर - नगर शहरातील आनंदी बाजार परिसरातील हजरत घोडे पीर दर्गा काही समाजकंटकांकडून तोडण्यात आल्याच्या घटनेनंतर परिसरातील नागरिक, भाविक आणि सामाजिक संघटनांकडून संताप व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर दर्ग्याच्या तातडीने पुनर्बांधणीसाठी प्रशासन व महापालिकेकडून बांधकाम परवानगी देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणात सामील असलेल्या समाजकंटकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यासाठी खासदार शरदचंद्र पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्यांक शहर जिल्हाध्यक्ष अलतमश जरीवाला यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले आहे.

निवेदन देताना शिष्टमंडळाने सांगितले की, हजरत घोडे पीर दर्गा हा परिसरातील लोकांचे श्रद्धास्थान आहे. या धार्मिक स्थळाचे नुकसान करून धार्मिक भावनांना धक्का देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन दर्ग्याची पुनर्बांधणी करण्यास परवानगी द्यावी आणि दोषींविरुद्ध कठोर कायदेशीर पावले उचलावीत, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

याप्रसंगी शरद पवारांना परिस्थितीची सविस्तर माहिती देण्यात आली. पवारांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिल्याचे शिष्टमंडळाकडून सांगण्यात आले.

यावेळी अलतमश जरीवाला, प्रदेश उपाध्यक्ष हाजी शौकत तांबोळी, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अथर खान, समीर पठाण, फारुक रंगरेज, आरिफ पटेल, रोहन शेलार, बाबू कुरेशी, नाजीश शाह, अनिस शेख, मोहसीन जहागिरदार, फय्याज तांबोळी, फैजान शेख आदी उपस्थित होते. अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी सुरक्षेच्या दृष्टीने योग्य ती पावले उचलावीत, अशी मागणीही शिष्टमंडळाने प्रशासनाकडे केली.

या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये अजूनही तणावपूर्ण वातावरण असून, प्रशासनाने योग्य ती कारवाई करून जनतेचा विश्वास परत मिळवावा, अशी मागणी होत आहे.

# व्यावसायिकाच्या बंद घरातून चोरी; सोन्या-चांदीचे दागिने व साहित्य लंपास

नगर - गणपती सुट्टीमुळे गावी गेलेल्या व्यावसायिकाचे घर चोरट्यांनी फोडून सोन्या-चांदीचे दागिने व घरगुती साहित्य असा ५० हजारांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना शहरातील बोरूडे मळा परिसरात घडली.

याबाबत पवनेश बाळासाहेब चव्हाण (रा. अमृतकलश अपार्टमेंट, फ्लॅट क्र. १०२, बोरूडे मळा) यांनी ३० ऑगस्ट रोजी रात्री दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी पवनेश चव्हाण हे २६ ऑगस्ट रोजी रात्री आपल्या कुटुंबासह मुळगाव सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यात गेले होते. ३० ऑगस्ट रोजी पहाटे पाच वाजून तीस मिनिटांच्या सुमारास शेजारी राहणारे संजय तुकाराम शिंदे यांनी त्यांना फोनवर कळवले की चव्हाण यांच्या बंद घराचे कुलूप तुटलेले आहे. त्यामुळे ते आपल्या चारचाकी वाहनातून दुपारी तीन वाजता घरी परतले असता, घराचे कुलूप व कडी कोंडा तोडलेले दिसून आले.

घरात प्रवेश केला असता सर्व सामान अस्ताव्यस्त अवस्थेत आढळले. लॉक केलेल्या बॅगाही उचकापाचक केल्या असून त्यातून सोन्याच्या तीन अंगठ्या, सोन्याची एक अंगठी, चांदीचा गणपती, चांदीचे जोडे, चांदीचा देवीचा मुकुट व इतर घरगुती साहित्य असा एकूण ५० हजार रूपयांचा मुद्देमाल चोरीस गेला आहे. या घटनेतच त्यांच्या शेजारील अपार्टमेंट मधील संकेत प्रसाद जोशी यांच्या घरातही चोरी झाल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस अंमलदार गोर्डे पुढील तपास करीत आहेत.

## इंदूबाई काळे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - सारोळा कासार येथील सौ. इंदुबाई रावसाहेब काळे (वय ७०) यांचे ३१ ऑगस्ट रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर सारोळा कासार स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पती, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शेतकरी रावसाहेब मारुती काळे यांच्या पत्नी तर प्रविण, ज्ञानदेव व कृषी उत्पन बाजार समितीचे सहसचिव संजय काळे यांच्या त्या मातोश्री, शिवसेना शहरप्रमुख (उबाठा) चे किरण गुलाब काळे यांच्या त्या चुलती होत.

## अजय गांधी यांचे हृदयविकाराने निधन



नगर - भूषणनगर, केडगाव येथील रहिवाशी अजय पोपटराव गांधी (वय ६५, रस्तापूरवाला) यांचे ३१ ऑगस्ट रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर केडगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सुजय गांधी व अश्विनी फिरोदिया यांचे ते वडिल होत.

## विमलबाई पगारिया यांचे संथारा व्रतात निधन



नगर - सातभाई मळा, बालिकाश्रम रोड, निर्मलधन बंगला येथील रहिवाशी सौ. विमलबाई दिलीपचंद पगरिया (वय ६९) यांचे ३० ऑगस्ट रोजी संथारा व्रतात निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पती, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, बहिण, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे.

## कैलाश मदान यांचे दुख:द निधन



नगर - नवीपेठ येथील अमित वॉच कंपनीचे संचालक कैलाश बलबीर मदान (वय ७२) यांचे ३० ऑगस्ट रोजी रात्री दुख:द निधन झाले. त्यांच्यावर ३१ ऑगस्ट रोजी सकाळी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, अमीत व विकास ही मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## सागर कसबे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - वैष्णवनगर, केडगाव येथील रहिवाशी सागर अशोक कबसे (वय ३२) यांचे २८ ऑगस्ट रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर रेल्वे स्टेशन रोड, लोखंडी पुलाजवळील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी, मुलगी, २ भाऊ, भावजया असा परिवार आहे. रोहित व राहुल कसबे यांचे ते लहान बंधू होत.

# समाजकंटकांपासून व्यापाऱ्यांना त्रास होणार नाही याची भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी काळजी घ्यावी

## अनिल मोहिते यांचे आवाहन; व्यापारी आघाडीच्या नूतन पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्रे प्रदान



भाजपाच्या शहर व्यापारी आघाडीच्या नव्या पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देताना शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते.

नगर - व्यापारी वर्ग कायम भाजपच्या मागे ठामपणे उभा असतो. म्हणूनच दिलीप गांधी यांच्या सारखा सामान्य कार्यकर्ता तीन वेळा खासदार झाले. भाजपाचे पदाधिकारीही शहरातील व्यापारी वर्गाच्या मागे उभे राहून त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असतात. जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या समक्ष शहरातील व्यापारी वर्गाला कोणताही त्रास होताकामा नव्हे; यासाठी उपाययोजना राबवा असे मनपा आयुक्तांना सांगितले आहे. भाजपच्या व्यापारी आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी बाजारपेठेत व्यापारी वर्गाला समाजकंटकांपासून त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. व्यापारी आघाडीने केलेल्या कामाची दखल पक्ष नक्कीच घेईल, असे प्रतिपादन शहर जिल्ह्ध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले.

भारतीय जनता पक्षाच्या शहर व्यापारी आघाडीच्या नव्या पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र अनिल मोहिते यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी माजी शहराध्यक्ष महेंद्र गंधे, सुनील रामदासी व वसंत लोढा, सरचिटणीस महेश नामदे व निखिल वारे, प्रदेश सदस्या गीता गिल्डा, माजी उपमहापौर मालन ढोणे, अशोकराव गायकवाड, बाबासाहेब सानप, ज्योती दांडगे, प्रिया जानवे, युवा मोर्चाचे अध्यक्ष रुद्रेश अंबाडे, व्यापारी आघाडीचे अध्यक्ष महेश गुगळे, सरचिटणीस हर्षल बोरा आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रास्ताविकात महेश गुगळे यांनी केलेल्या कामांची माहिती देत सांगितले, शहरात गेल्या अनेक वर्षांपासून व्यापारी आघाडी सक्रियपणे काम करत व्यापाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. पक्षाचे केलेल्या कामाची दखल घेत येणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत व्यापारी आघाडीचा विचार करावा, अशी मागणी केली.

यावेळी महेंद्र गंधे, वसंत लोढा, निखील वारे आदींनी मनोगत व्यक्त करून व्यापारी आघाडीचे कौतुक केले. उपाध्यक्ष प्रशांत बुऱ्हाडे यांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्शल बोरा यांनी केले. सरचिटणीस लक्ष्मिकांत तिवारी यांनी आभार मानले.

यावेळी मंडल अध्यक्ष सचिन जाधव, मयूर बोचूघोळ, ज्ञानेश्वर काळे, धनंजय जाधव, गोपाल वर्मा, प्रशांत मुथा, गणेश विद्दे, वैभव सुरवसे, नितीन शेलार, शशिकांत कुलकर्णी, लीला अग्रवाल, व्यापारी आघाडीचे नूतन उपाध्यक्ष रुपेश वर्मा, प्रशांत डहाळे व सुरेश लालबागे, सरचिटणीस निरज राठोड, चिटणीस संजय कांगला, दिनेश तलरेजा, महेंद्र नांदुरकर व दीपक धेरेकर आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## हातात तलवार घेवून दहशत करणाऱ्याला माळीवाड्यात पकडले

नगर - हातात तलवार घेवून दहशत करणाऱ्याला कोतवाली पोलिसांनी माळीवाडा परिसरातील साठे वसाहत हरिजन वस्ती येथे ३१ ऑगस्ट रोजी दुपारी ३.४० वाजण्याच्या सुमारास पकडले आहे. सचिन अनिल गायकवाड (वय ३५, रा. साठे वसाहत, हरिजन वस्ती, माळीवाडा) असे पकडलेल्या तरुणाचे नाव आहे.

कोतवाली पोलिसांना माहिती मिळाली की एक तरुण हातात तलवार घेवून परिसरात दहशत करत फिरत आहे. ही माहिती मिळताच पोलिसांच्या पथकाने तेथे जावून सचिन गायकवाड याला ताब्यात घेत त्याच्या कडून धारदार तलवार जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी पो.कॉ.अमोल गाडे यांच्या फिर्यादी वरून त्याच्या विरुद्ध आर्म ॲक्ट ४/२५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मंदिराच्या पंचधातूच्या कळसाची चोरी

नगर - खारेकर्जुने (ता. नगर) रस्त्यावरील गोसावी बाबा मंदिरात रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्याने चोरी करून १८ किलो वजनाचा पंचधातूचा कळस आणि इलेक्ट्रिक पाण्याची मोटार, केबल वायर, प्लास्टिक पाइप असा २१ हजार रूपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला.

याप्रकरणी विठ्ठल रामदास गेरंगे (वय ४२, रा. चिंचोली वस्ती, इसळक, ता. नगर) यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना २९ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजेपासून ते ३० ऑगस्ट रोजी पहाटे पाच वाजेच्या दरम्यान झाली. चोरट्याने मंदिरावरील १८ हजार रूपये किमतीचा १८ किलो वजनाचा पंचधातूचा कळस आणि मंदिरालगतच्या हौदातील तीन हजार रूपये किमतीची इलेक्ट्रिक मोटार, वायर आणि प्लास्टिक पाइप चोरले. विठ्ठल गेरंगे यांनी ३० ऑगस्ट रोजी रात्री दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# नगरमध्ये ७ सप्टेंबर रोजी संस्कृत स्तोत्र पठण स्पर्धा

नगर - गुंजारव : या संस्कृत त्रैमासिकाच्या वतीने डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ संस्कृत स्तोत्र आणि गीतेच्या अध्यायाच्या पठण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर हे संस्कृत पंडित, महामहोपाध्याय होते आणि त्यांनी संस्कृत विषयात केलेल्या कार्यासाठी त्यांना राष्ट्रपती पुरस्काराने आणि इतर अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते. स्पर्धेचे हे दुसरे वर्ष आहे. सदर स्पर्धा ज्ञानसंपदा इंग्लीश मिडियम स्कूल, भिस्तबाग, सावेडी येथे ७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजल्यापासून होणार आहे. स्पर्धा संपल्यानंतर लगेचच पारितोषिक वितरण समारंभ पुणे येथील प्रवचनकार आणि भागवतकार डॉ.कल्याणी नामजोशी यांच्या हस्ते होईल. सदर सर्धेसाठी इयत्ता ५ वी ते ७ वी गटासाठी पांडुरंगाष्टकम, मधुराष्टकम् आणि शिवमानस स्तोत्र यापैकी एक स्तोत्र तसेच ८ वी ते १० वी गटासाठी श्रीमद्भगवद्गीतेच्या १२ व्या किंवा १५ व्या अध्यायापैकी एक अध्याय हे विषय निवडण्यात आले आहेत. स्पर्धेसाठी संस्कृत प्रेमी अभ्यासक यांनी उपस्थित रहावे असे आवाहन स्पर्धा संयोजक सौ. रेणुका मुळे, मकरंद खरवंडीकर आणि डॉ.धनश्री खरवंडीकर यांनी केले आहे.

## हद्दपारी आदेशाचा भंग करणाऱ्याला पकडले

नगर - नगर जिल्ह्यातून २ वर्षांसाठी हद्दपार केलेला आरोपी या आदेशाचा भंग करून नगर शहरात फिरत असल्याचे आढळून आल्यावर कोतवाली पोलिसांनी त्याला पकडले असून त्याच्या विरुद्ध हद्दपारी आदेशाचा भंग केल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. विजय गजानन भनगडे (वय ३२, रा. भवरी चाळ, संभाजी कॉलनी, रेल्वेस्टेशन) असे या आरोपीचे नाव आहे. आरोपी भनगडे याला नगरच्या प्रांताधिकाऱ्यांनी १८ मार्च २०२४ रोजी नगर जिल्ह्यातून २ वर्षांसाठी हद्दपार केले होते. ही मुदत संपण्यापूर्वीच त्याने या आदेशाचा भंग करत शहरात प्रवेश केला. तो शहरात वावरत असल्याची माहिती मिळताच कोतवाली पोलिसांनी त्याला राहत्या घराजवळून ताब्यात घेत त्याच्या विरुद्ध महाराष्ट्र पोलिस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सेल्फ ॲडेसिव्ह पी व्हि सी वॉल टाईल्स, सेल्फ ॲडेसिव्ह वॉलपेपर, किचन वॉलपेपर, रोमन ब्लॉईंडस्, रोलर ब्लॉईंडस्, झेब्रा ब्लॉईंडस्, व्हर्टिकल ब्लॉईंडस, उडन ब्लॉईंडस्, कस्टमाईज ब्लॉईंडस्, चीक् ब्लॉईंडस्, तयार कर्टन्स, कर्टन क्लॉथ, कर्टन रॉड व फिटींग, मच्छर जाळी, आर्टिफिशियल ग्रास, धुळी पासुन संरक्षणसाठी प्लास्टीक तयार पडदे

गुलाबचंद कारपेटवाला

खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.

मो. ९४२२३३९४६०, ९४२२३३९४४२, ९४२२४५४००५



'अमृतसागर' च्या वार्षिक अहवालात, वैयक्तिक दूध उत्पादकांत सौ. शितल नाईकवाडी यांनी अकोले तालुक्यात तिसरा क्रमांक मिळवला.

## 'अमृतसागर' च्या वार्षिक अहवालात सौ. शितल नाईकवाडी यांनी वैयक्तिक दूध उत्पादकांत अकोले तालुक्यात मिळवला तिसरा क्रमांक

नगर – अमृतसागर सहकारी दूध व्यवसायिक व प्रक्रिया संघ मर्या., अकोले यांच्या वार्षिक अहवालात श्रीदत्त दूध उत्पादक सहकारी संस्थेच्या सभासद सौ. शितल नाईकवाडी यांनी वैयक्तिक दूध उत्पादकांत अकोले तालुक्यात तिसरा क्रमांक मिळवला.

नाईकवाडी यांनी १,४४,५७२ लिटर दूध उत्पादन करून हा क्रमांक पटकावला. या कामगिरीबद्दल त्यांना अमृतसागर दूध संघाच्या वार्षिक सभेत संघाचे चेअरमन वैभवराव पिचड, उपाध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, मुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ सावंत, संचालक गंगाधर नाईकवाडी, जगन देशमुख, आप्पासाहेब आवारी, संचालक दयानंद वैद्य यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

यावेळी नाईकवाडी कुटुंबीय व गणेश पापळ, श्रीदत्त दूध संस्थेचे चेअरमन दिनकर जाधव, संदीप भोर, मधुकर भोर, संपत भोर, गणेश कोटकर, डॉ.विशाल आरोटे, सत्यम भोर, दत्तू भोर, संतोष भोर, राजेंद्र वाळुंज, गोरख मालुंजकर, सयाजी पोखरकर, राम तळेकर, नाथा भोर, सीताराम भांगरे व तालुक्यातील सर्व दूध उत्पादक आदी उपस्थित होते. या दूध उत्पादक गोठ्याचे नाव ओम साई काऊ फार्म अंबड या नावाने २०१७ साली ०६ गाईंपासून सुरुवात झाली. आता तब्बल ३८ गाईंमध्ये १४४७७२ लिटर दूध पुरवठा करणारा अकोल्यातील पश्चिम भागात सर्वात जास्त व तालुक्यात तीन नंबरचा मुक्त संचार गोठा नावारूपास आला. तसेच या गोठ्याचे व्यवस्थापन बांधकाम व्यावसायिक मिलिंद नाईकवाडी व त्यांच्या पत्नी शीतल नाईकवाडी शिक्षिका असूनही हे दोघेही सर्व नियोजन बघतात. या गोठ्यामध्ये फक्त दोन मजुरांसह गोठ्याचे नियोजन पहाटे चार वाजेपासून सात वाजेपर्यंत व सायंकाळी चार वाजेपासून सात वाजेपर्यंत उत्कृष्टपणे नियोजनबद्ध चालते. या सर्व देखरेखेसाठी फक्त मिलिंद नाईकवाडी यांचे नियोजनामुळे हे सर्व शक्य झाले असे त्यांचे मत त्यांनी व्यक्त केले.

# मोबाईल, संगणक आणि इंटरनेट या साधनांचा अपव्यय न करता त्यातून 'शिकण्याची वृत्ती' निर्माण केली पाहिजे

### भास्कर पाटील यांचे प्रतिपादन; श्री समर्थ विद्यामंदिर प्राथमिक सांगळेगल्ली विभागात संगणक कक्षाचे उद्घाटन





श्री समर्थ विद्यामंदिर प्राथमिक सांगळेगल्ली विभागात संगणक कक्षाचे उद्घाटन प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सदस्य ॲड. किशोर देशपांडे, सुरेश क्षीरसागर, श्रीपाद कुलकर्णी, संजय कुलकर्णी, सुनील जोशी, मुख्याध्यापक अजय महाजन, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी उपस्थित होते.

नगर – आधुनिक काळाशी सुसंगत बदल स्वीकारण्याचे आवाहन केले. आजचा काळ हा वेगवान तंत्रज्ञानाचा आहे. मोबाईल, संगणक व इंटरनेट या साधनांचा योग्य वापर केला, तर त्यातून आपण प्रचंड ज्ञान मिळवू शकतो. मात्र या साधनांचा अपव्यय न करता त्यातून शिकण्याची वृत्ती निर्माण केली पाहिजे. प्रत्येकाने आपल्या वेळेचे नियोजन करून पुस्तके वाचली पाहिजेत. कारण पुस्तक वाचन हीच संस्कारांची खरी शिदोरी आहे. पुस्तके वाचली, विचार वाढले तरच आपली संस्कृती टिकून राहील, असे त्यांनी सांगितले. तसेच मुलांना स्पर्धा परीक्षांसाठी योग्य अभ्यास पद्धती, सातत्य आणि आत्मविश्वास याबाबत प्रमुख पाहुणे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शिक्षण क्षेत्रात नवनवीन उपक्रम राबविण्यात अग्रगण्य असलेल्या श्री समर्थ विद्यामंदिर प्राथमिक सांगळेगल्ली विभागात संगणक कक्षाचे उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात संस्थेचे सदस्य ॲड.किशोर देशपांडे यांनी संगणक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना विज्ञान विषयातील आकृत्या, प्रयोग व विविध तांत्रिक संकल्पना अधिक चांगल्या प्रकारे समजतील असे सांगितले. संगणक ही केवळ शैक्षणिक साधन नाही तर ती भविष्यातील करिअरची दारे उघडणारी किल्ली आहे. आजचे युग स्पर्धेचे आहे. त्यामुळे प्रत्येकाने संगणकाच्या साहाय्याने नवनवीन माहिती मिळवून आपल्या ज्ञानात भर टाकली पाहिजे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही जागतिक स्तरावर स्पर्धा करता यावी, यासाठी संगणक साक्षरता अनिवार्य आहे, असे ते म्हणाले. पुढे बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, शिस्त आणि परिश्रम या गुणांच्या साहाय्याने समाजात आपले वेगळे स्थान निर्माण करण्याचे आवाहन केले.

प्रास्ताविकातून शाळेचे मुख्याध्यापक अजय महाजन यांनी मुलांना संगणक शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितले. त्यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून शाळेस मिळणाऱ्या सुविधा व मुलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी होणाऱ्या प्रयत्नांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाला शाळेचे सेक्रेटरी सुरेश क्षीरसागर, शालेय समिती चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, संस्थेचे खजिनदार संजय कुलकर्णी, संस्थेचे सदस्य सुनील जोशी तसेच माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. वसुधा जोशी उपस्थित होते.

सूत्रसंचालन लीना बंगाळ यांनी केले. सोनाली माकरे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षकवर्ग व कर्मचाऱ्यांमध्ये सतीश मेढे, शंकर निंबाळकर, संदीप गायकवाड, किशोर महाजन, सौ. वैशाली मगर, सौ. तिलोत्तमा देशमुख, प्रमिला आल्हाट, सौ. सविता येवले, शीतल जऱ्हाड, सौ. मोहिनी नाटाळे, रुपाली धोत्रे आदींनी परिश्रम घेतले.

## सौ.सविता कोठारी यांच्या ३१ उपवास मासखमणाची ३ सप्टेंबरला पचकावनी

नगर – आगरकारमळा चातुर्मास २०२५ ची शोभा वाढवणारे



ज्ञान, आराधाना, तप, जप, साधना, स्वाध्यायने श्रावक संघाची शान वाढवणारे ज्ञान गंगोत्री प्रभाकँवरजी मा.सा. ची सुशिष्या जिन शासन प्रभाविका, शासन गौरव अनुप्रेक्षाजी मा.सा., श्रुतिप्रभाजी मा.सा, ऋजुप्रभाजी मा.सा. आदि ठाना ३ यांच्या प्रेरनेने सौ. सविता अभय कोठारी यांच्या ३१ उपवास मासखमण ची पचकावणी ३ सप्टेंबर रोज़ी सकाळी १० वाजता आगरकरमळा जैन स्थानका मधे होणार आहे.

तपस्वीला अनुमोदना व अभिनंदन करण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन महावीर श्रावक संघ अध्यक्ष अभय कोठारी व कोठारी परिवार मिरजगांवकर यांनी केली आहे.

# पूर्वीचे ऋषीमुनी वर्षानुवर्ष ध्यानधारणा तपश्चर्या करून विविध विषयात पारंगत होते

### अरविंद पारगावकर यांचे प्रतिपादन; सनातन धर्मसभेतर्फे ऋषीतुल्यांचा सत्कार



सनातन धर्म सभेतर्फे ऋषिपंचमीच्या दिनी ऋषितुल्य म्हणून सन्मान करण्यात आला.

नगर – पूर्वीचे ऋषीमुनी वर्षानुवर्ष ध्यानधारणा तपश्चर्या करून विविध विषयात पारंगत होते. वेद विद्यासह अनेक सिद्धी त्यांनी प्राप्त केल्या होत्या. त्या युगातील ते वैज्ञानिकच होते समकालीन राजे यांना विविध विषयावर सल्ले देऊन राज्य कारभार करण्याचे नियोजनही त्या काळातील ऋषीमुनी करत होते, असे प्रतिपादन एल ॲण्ड टी चे अरविंद पारगावकर यांनी केले.

येथील सनातन धर्मसभेतर्फे समाजातील विविध क्षेत्रात नाविन्यपूर्ण काम केलेल्यांचा ऋषीतुल्य म्हणून सत्कार करण्यात आला. त्यावेळी सत्कारमूर्ती अरविंद पारगावकर सत्काराला उत्तर देताना बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष वेदमूर्ती दत्तोपंत पाठक, निळकंठ देशमुख, रमेश देशपांडे, दिनकर देशमुख, उमेश वाळुंजकर, उदय वैकर, चकोर मुळे, निलेश धर्माधिकारी उपस्थित होते. यावेळी वेदमूर्ती पंढरपूरकर गुरुजी, वेदमूर्ती शंकरराव देशमुख, भीमराव पठारे, आर. जी. कुलकर्णी, अशोकराव मुळे, गणेश वैकर यांचा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

ऋषितुल्य म्हणजे जंगलात जाऊन तपश्चर्या करणे, संसाराचा त्याग करणे, असे नसून समाजासाठी उपयुक्त काम करणारे हे काम जे करीत आहेत. ते काम ऋषीमुनीसारखेच आहे. त्या कामाची दखल घेऊन संस्था सत्कार ऋषीतुल्य म्हणूनच करत आहे, असे प्रतिपादन सनातन धर्म सभेचे अध्यक्ष वेदमूर्ती दत्तोपंत पाठक यांनी केले.

संस्था गेले १२० वर्षापासून समाजातील अशाच व्यक्तींचा ऋषिपंचमीच्या दिनी सन्मान करीत आहे. यावेळी त्यांनी वर्षभरात येत असलेल्या पंचमीचे महत्त्व तसेच ऋषिपंचमीचेही महत्त्व सर्व त्यांना सांगितले. सूत्रसंचालन दिनकर देशमुख यांनी केले. निळकंठ देशमुख यांनी आभार मानले.

# फिरोदिया शिवाजीयन्स इंटरस्कूल फुटबॉल स्पर्धेत रंगतदार सामन्यात खेळाडूंनी केले उत्कृष्ट प्रदर्शन

### विविध गटातील संघाची आघाडी, आर्मी पब्लिक स्कूलच्या श्रेया कावरे हिने केले तब्बल ७ गोल



नगर – फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेत ३० ऑगस्ट रोजी झालेल्या सामन्यात १४ वर्ष वयोगटात आर्मी पब्लिक स्कूल, कैसर एज्युकेशन, आठरे पाटील स्कूल, तर १२ वर्ष वयोगटात ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूलचे संघ विजयी ठरले. १७ वर्षा खालील मुलींच्या गटात आर्मी पब्लिक स्कूलने विजय संपादन केले. यामध्ये श्रेया कावरे हिने उत्कृष्ट खेळ करुन तब बल ७ गोल केले होते.

१४ वर्ष वयोगटात (मुले) आर्मी पब्लिक स्कूल विरुध्द अशोकभाऊ फिरोदिया स्कूलमध्ये सामना रंगला होता. आर्मी पब्लिक स्कूलने आक्रमक खेळी करुन ६ गोल केले. यामध्ये प्रथमेश लहाडे याने ३, आशिष शेळके याने २ व शंतनू याने १ गोल केला. प्रतिस्पर्धी संघाला एकही गोल करता आला नाही. ६–० गोलने आर्मी पब्लिक स्कूलचा संघ विजयी ठरला.

कैसर एज्युकेशन स्कूल विरुध्द डॉन बॉस्को स्कूलमध्ये अटातटीचा सामना रंगला होता. यामध्ये वेदांत भांडेकर याने १ गोल करुन १–० गोलत्याचप्रमाणे तक्षिला स्कूल विरुध्द आठरे पाटील स्कूलमध्ये झालेल्या सामन्यात आठरे पाटील संघाने ३–१ गोलने विजय संपादन केले. आठरे पाटील कडून साई खतोडे याने २ व ओम गलांडे याने १ गोल केला. तक्षिला स्कूल कडून शौर्य मोरे याने १ गोल केला.

१७ वर्षा खालील मुलींच्या गटात आर्मी पब्लिक स्कूल विरुध्द डॉन बॉस्को स्कूल मध्ये झालेल्या सामन्यात आर्मी पब्लिक स्कूलच्या संघाने १०–० गोलने वर्चस्व दाखवित एकहाती विजय मिळवला. श्रेया कावरे हिने तब्बल ७ गोल केले. तर आरती हिने २ व श्रेया पवार हिने १ गोल केला. प्रतिस्पर्धी संघाला आर्मी पब्लिक स्कूलच्या आक्रमक खेळापुढे एकही गोल करता आला नाही.

१२ वर्ष वयोगटात (मुले) द आयकॉन पब्लिक स्कूल विरुध्द ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूलमध्ये झालेल्या सामन्यात ०–१ गोलने ऑक्झिलियम कॉन्व्हेंटचा संघ विजयी झाला. यामध्ये वेदांत बांगर याने १ गोल करुन संघाला विजय मिळवून दिला.

१६ वर्ष वयोगटात तक्षिला स्कूल विरुध्द आठरे पाटील स्कूलमध्ये रंगतदार सामना प्रेक्षकांना पहावयास मिळाला. शेवट पर्यंत दोन्ही संघ विजयासाठी झुंजत होते. दोन्ही संघानी २–२ गोल करुन बरोबरी साधली. शेवटच्या क्षणापर्यंत दोन्ही संघांनी उत्कृष्ट खेळी करुन एकमेकांना गोल करु दिला नाही. हा सामना बरोबरीत सुटला. यामध्ये तक्षिला स्कूल कडून जस्वीर ग्रोव्हर व आयुष गुंड यांनी प्रत्येकी १ गोल केला. तर आठरे पाटील स्कूलकडून भानुदास चंद याने २ गोल केले.

## 'जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत' विराज बोडखेने पटकाविले सुवर्णपदक

### पुणे विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड



जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत पै.विराज बोडखेने सुवर्णपदक पटकावले. (छाया – लहू दळवी)

नगर – जिल्हा क्रिडाधिकारी कार्यालय व महापालिका क्रीडा विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत पै. विराज बोडखे याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन १७ वर्षाखालील गटात सुवर्णपदक पटकाविले. त्याची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. नुकतेच शहरातील भिस्तबाग, पवननगर येथील छत्रपती संभाजी महाराज कुस्ती केंद्र येथे जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा पार पडली. यामध्ये महापालिका हद्दीतील विविध शाळांतील ११५ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. पै. विराज बोडखे याने चितपट कुस्ती करुन विजेतेपद पटकाविले आहे. त्याची पुणे विभागीय पातळीवरील स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये पुणे, सोलापूर व नगर या जिल्ह्यातील विजयी झालेल्या खेळाडूंमध्ये सामने होणार आहेत. यामधील विजयी खेळाडू राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहेत.

पै. विराज बोडखे हा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक तथा शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांचा लहान मुलगा आहे. तो भिस्तबाग येथील छत्रपती संभाजी महाराज कुस्ती केंद्रात पै. शिवाजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वस्ताद पै. संदीप गायकवाड, पै. नितीन आव्हाड, पै. आतीष ठाकूर, पै. शंभू यादव यांच्याकडे कुस्तीचे धडे घेत आहेत. तो सावेडी येथील आनंद विद्यालयात इयत्ता दहावी मध्ये शिकत आहे.



माळीवाड्यातील सराफ व्यावसायिक शहाणे परिवाराच्यावतीने सौ.रेश्मा श्रीपाद शहाणे आणि सौ.वैशाली देवदत्त शहाणे यांनी गौरीची सजावट केली आहे.

# संमेलनामुळे शहरात चांगले सांस्कृतिक वातावरण निर्माण होईल

### ॲड. विश्वासराव आठरे यांचा विश्वास, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण



अहिल्यानगरमध्ये होणाऱ्या राज्यस्तरीय नाट्य व साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण करताना जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे.

नगर – न्यू आर्ट्स कॉमर्स महाविद्यालयात मसापचे साहित्य संमेलन होणे हे आनंददायी आहे. शहरात सांस्कृतिक वातावरण असल्याशिवाय शहर उठून दिसणार नाही. यासाठी सातत्याने कला, साहित्यिक उपक्रम शहरात होणे आवश्यक आहे. मसापच्या युवा साहित्य संमेलनामुळे शहरात चांगले वातावरण निर्माण होऊन शहराला अधिक उंचीवर नेईल. यासाठीच आमची संस्था अशा साहित्यिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या मागे कायम उभी असते. हे संमेलन यशस्वी होण्यासाठी सर्वांनी यात सहभाग घ्यावा, असे प्रतिपादन महाविद्यालयात जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे यांनी केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद पुण्याच्या वतीने यंदाचे राज्यस्तरीय युवा साहित्य व नाट्य नाट्य संमेलनाचे यजमानपद अहिल्यानगरच्या मसापच्या सावेडी उपनगर शाखेला मिळाले आहे. अहिल्यानगर मध्ये ११ व १२ सप्टेंबरला होणाऱ्या या नाट्य व साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावर न्यू आर्ट्स कॉमर्स महाविद्यालयात ॲड. विश्वासराव आठरे यांच्या हस्ते झाले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, मसापच्या सावेडी उपनगर शाखेचे प्रमुख कार्यवाह जयंत येलुलकर, कवी चंद्रकांत पालवे, सावेडी शाखेचे पदाधिकारी सुरेश चव्हाण, उद्योजक रोहन कुलकर्णी, खजिनदार स्नेहल उपाध्ये आदींसह पदाधिकारी व प्राध्यापक उपस्थित होते.

प्राचार्य बाळासाहेब सागडे म्हणाले, न्यू आर्ट्स कॉमर्स महाविद्यालयात राज्यस्तरीय साहित्य नाटय संमेलन घेण्याचा प्रस्ताव संस्थेने तातडीने मान्य केला. अशा संमेलातून उदयोन्मुख कवी व साहित्यिक घडतील. नगरकरांसाठी हे युवा साहित्य व नाट्य संमेलन एक मोठी परवानी ठरणार आहे. मसापच्या सावेडी उपनगर शाखेचे कार्य कौतुकास्पद असून त्यांच्या उपक्रमांना कायम सहकार्य करू.


प्रास्ताविकात जयंत येलुलकर म्हणाले, सावेडी उपनगर शाखेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या नेतृत्वाखालील शाखेने २०१७ साली नगरमध्ये झालेले विभागीय साहित्य संमेलन यशस्वीरीत्या संपन्न केले होते. त्यामुळेच पुन्हा हे संमेलन कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी व पदाधिकारी, सदस्य यांच्या मुळे नगरमध्ये घेण्याचा मोठा बहुमान उपनगर शाखेला मिळाला आहे. हे संमेलन यशस्वी होण्यासाठी सर्वस्तरातून मदतीची गरज आहे. जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्था या संमेलनासाठी जागा उपलब्ध करून देत मोठे सहकार्य केले आहे. या संमेलनात दोन दिवस भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व नागरिकांनी या संमेलनात सहभागी होत हे संमेलन यशस्वी करावे.

उद्योजक रोहन कुलकर्णी यांनी मसापच्या सावेडी उपनगर शाखेच्या कार्याचे कौतुक करून होणाऱ्या साहित्य संमेलनामुळे शहरात चांगले साहित्यिक व सांस्कृतिक वातावरण निर्माण होणार असल्याच्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.गणेश भगत यांनी केले. चंद्रकांत पालवे यांनी आभार मानले. यावेळी उपनगर शाखेच्या बाळकृष्ण गोटीपामुल, किरण गवते, ज्येष्ठ कवी ल.धो. खराडे, प्रा. चंद्रकांत जोशी, ॲलेक्स कदम, न्यू आर्ट्स कॉमर्स महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर, उपप्राचार्य डॉ.अनिल आठरे, उपप्राचार्य प्रा. कल्पना दारकुंडे, पर्यवेक्षक सुभाष गोरे, प्रा.नितीन दुधाडे, प्रा.संगीता निमसे, प्रा.मच्छिंद्र मालुंजकर, संतोष कानडे, प्रबंधक बबन साबळे आदीसह प्राध्यापक उपस्थित होते.

# गणेशोत्सवात नेत्रदान-अवयवदान जनजागृतीचे देखावे सादर करण्याचे 'फिनिक्स'तर्फे आवाहन

## उत्कृष्ट देखावा सादर करणाऱ्या गणेश मंडळांना रोख बक्षिस व पुरस्कार जाहीर

नगर – गणेशोत्सव हा सामाजिक संदेश देण्यासाठी प्रभावी व्यासपीठ असून, नेत्रदान, अवयवदान व देहदान या विषयांवर जनजागृती करण्यासाठी देखावे सादर करण्याचे आवाहन फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.



या विषयांवर उत्कृष्ट देखावे सादर करणाऱ्या गणेश मंडळांचा जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक व जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या हस्ते विशेष गौरव, रोख बक्षिस व पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी दिली.



जालिंदर बोरुडे

सध्या देशात व राज्यात हजारो रुग्ण अवयव प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत आहेत. परंतु, अवयवदानासंदर्भात अनेक गैरसमजुती समाजात प्रचलित आहेत. फिनिक्स फाऊंडेशन या गैरसमजुती दूर करण्याचे कार्य सातत्याने करत आहे. या चळवळीतून आतापर्यंत अनेकांनी नेत्रदान करून अंधांना नवदृष्टी दिली आहे.

गणेशोत्सवात दरवर्षी विविध विषयांवरील देखावे उभारले जातात. परंतु, नेत्रदान, अवयवदान व देहदानाची जागृती होण्यासाठी अधिक ठोस प्रयत्नांची गरज आहे. अवयव कृत्रिमरीत्या तयार होऊ शकत नसल्याने फक्त मरणोत्तर अवयवदानातूनच गरजू रुग्णांना नवजीवन मिळू शकणार असल्याचे फाऊंडेशनच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

अवयवदानाने अनेक गरजूंना नवजीवन मिळू शकते. हे कार्य हे केवळ दान नसून, समाजासाठी केलेले महान पुण्यकर्म आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजात मोठ्या प्रमाणावर या संकल्पनेचा प्रचार-प्रसार होण्याची आवश्यकता असल्याची भावना जालिंदर बोरुडे यांनी व्यक्त केली.

# 'डेंगू मुक्तीसाठी घराघरात जनजागृती व स्वच्छता आवश्यक'

## आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन; फकीरवाडा मुकुंदनगर डेंगू मुक्त अभियान; नागरिक, विद्यार्थी, आशा सेविकांचा सहभाग

नगर – एडीस इजिप्ती हा डेंगू डास स्वच्छ साचलेल्या पाण्यात अंडी घालतो आणि दिवसा गुडघ्याखाली चावतो. त्यामुळे शरीरातील पांढऱ्या पेशी कमी होतात. लहान मुले आणि वयोवृद्ध यांना या आजाराचा सर्वाधिक त्रास होतो. काही वेळा डेंगूमुळे मृत्यूही संभवतो. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या वतीने डेंगू मुक्त अहिल्यानगर अभियान सुरू असून विद्यार्थी, आरोग्य कर्मचारी व आशा सेविका नागरिकांच्या घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी व जनजागृती करत आहेत. या उपक्रमामुळे डेंगूवर नियंत्रण मिळाले असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.



फकीरवाडा मुकुंदनगर येथे आयोजित अभियानात आयुक्त यशवंत डांगे, योगीराज गाडे, असिफ सुलतान, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. दिलीप बागल, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. रजत येवले, मुख्याध्यापिका संगीता लांडगे, प्रभाग अधिकारी श्याम गोडळकर, दीक्षा घाटविसावे, नीता रसाळ, योगेश गुंड आदी उपस्थित होते. (छाया – लहू दळवी)

फकीरवाडा मुकुंदनगर येथे आयोजित अभियानात आयुक्त यशवंत डांगे, माजी नगरसेवक योगीराज गाडे, असिफ सुलतान, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. दिलीप बागल, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. रजत येवले, मुख्याध्यापिका संगीता लांडगे, प्रभाग अधिकारी श्याम गोडळकर, दीक्षा घाटविसावे, नीता रसाळ, योगेश गुंड आदी उपस्थित होते.

माजी नगरसेवक योगीराज गाडे म्हणाले की, डेंगू मुक्त अभियानामुळे नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण होत आहे. आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचे योगदान मोठे असून त्यांच्या मेहनतीमुळेच साथीच्या आजारांवर नियंत्रण मिळण्यास मदत झाली आहे.

असिफ सुलतान म्हणाले, आयुक्त यशवंत डांगे यांनी उपक्रम सुरू करून जनजागृती घडवली आहे. विद्यार्थी हे उद्याचे भविष्य असून त्यांच्यामध्ये समाजाप्रती बांधिलकी निर्माण होईल. मुकुंदनगर आरोग्य केंद्रातील डॉक्टर व सिस्टर हे नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत उत्तम सेवा देत आहेत.

डॉ. सृष्टी बनसोडे यांनी डेंगू आजाराबाबत माहिती दिली. डॉ. सतीश राजुरकर यांनी आभार मानले. आयुक्त यशवंत डांगे यांचा विद्यार्थ्यांना संदेश देताना म्हटले की, विज्ञान शाप की वरदान? सोशल मीडियाचा वापर चांगल्या कामासाठी केल्यास वरदान, वाईट कामासाठी केल्यास शाप. मोबाईलकडे आकर्षित न होता अभ्यास व खेळाकडे लक्ष द्या. सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन समाजात जनजागृती करा. आपले घर व परिसर स्वच्छ ठेवा आणि आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळा.

# समता, सदाचार, अहिंसा भक्तीमय जीवनाचा संदेश देणारे श्री चक्रधर स्वामी

## गुंफेकर बाबा यांचे प्रतिपादन; ८०४ वा श्री चक्रधर स्वामींचा अवतार दिन महोत्सव उत्साहात साजरा

नगर – श्री चक्रधर स्वामी हे थोर समाज सुधारक होते. त्यांनी समाजामध्ये निर्माण झालेल्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक विषमतेला विरोध केला. श्री चक्रधर स्वामींनी समता, सदाचार, अहिंसा व भक्तिमय जीवनाचा संदेश दिला, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे स्वागतअध्यक्ष आचार्य श्री गुंफेकर बाबा (भोकर) यांनी केले.



अखिल भारतीय महानुभव परिषद अंतर्गत अहिल्यानगर जिल्हा महानुभाव परिषद द्वारा कर्जत तालुका महानुभव समितीच्या वतीने मिरजगाव येथे आयोजित जिल्हास्तरीय सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचा ८०४ वा अवतार दिनमहोत्सवाचे उद्घाटन दीप प्रज्वलनाने करताना आचार्य श्री गुंफेकर बाबा (भोकर). (छाया – समीर मन्यार)

अखिल भारतीय महानुभव परिषद अंतर्गत अहिल्यानगर जिल्हा महानुभाव परिषद द्वारा कर्जत तालुका महानुभव समिती च्या वतीने मिरजगाव येथे आयोजित जिल्हास्तरीय सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचा ८०४ वा अवतार दिन महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आचार्य श्री लोणारकर बाबा (बुलढाणा), अहिल्यानगर महानुभाव परिषदेचे जिल्हाध्यक्ष श्रीकृष्णराजबाबाजी लाड, कार्याध्यक्ष घुगे बाबाजी उपाध्यक्ष आचार्य श्री निमगावकर बाबा, सुदाम राजदादा धाराशिवकर, प्रभाकर बाबा, मुरलीधर शास्त्री, तपस्विनी पुनमबाईजी पंजाबी, बाबासाहेब रणसिंग, नगर तालुका अध्यक्ष भगवान अनारसे, उपाध्यक्ष विजय साठे आदींसह जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील महानुभाव पंथीय उपस्थित होते.

पुढे बोलताना गुंफेकर बाबा म्हणाले की ईश्वर संकटे देतो तो दूरही करतो. त्यासाठी भक्ती करणं हे आपलं कर्तव्य आहे. परमेश्वराची भक्ती केल्याने जीवन आनंदी होते. सत्य हे कडू असतं परंतु त्याचं मिळणार फळ हे गोड असते. प्रत्येक माणसाने निस्वार्थ जीवन जगावे वाणी गोड असावी. प्रयत्नांची कास न सोडता परमेश्वराचे स्मरण करावे. असे ते म्हणाले.

यावेळी आचार्य लोणारकर बाबा (बुलढाणा) म्हणाले की ज्या शरीरासाठी आपण धावतो ती माती आहे. आत्मा निघून गेल्यानंतर शरीराची माती होणार आहे परंतु आत्मा हा अजरामर राहतो. आत्म्याचं भलं करण्यासाठी आपण चांगले कर्म केले पाहिजे. आत्म कल्याणासाठी स्वामी मार्ग शोधला पाहिजे. असे ते म्हणाले.

यावेळी अहिल्यानगर महानुभव पंथाचे जिल्हाध्यक्ष श्रीकृष्णराज बाबाजी लाड, उपाध्यक्ष निमगावकर बाबाजी कवी दीपकराजे शास्त्री यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याला प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मल्ले बाबा, अविनाश दादा धाराशिवकर यांनी केले. बाळकृष्णदादा धाराशिवकर यांनी आभार मानले.

# अमेरिकेतही गणेशोत्सवाची धूम

## अहिल्यानगरच्या सीए अभिजीत विधाते यांच्याकडून सॅन होजे येथे श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठा

नगर – भारतीय संस्कृतीचे वैभव परदेशात पोहचविण्याचे कार्य नगरच्या पुत्राने केले आहे. अहिल्यानगरचे रहिवासी व अमेरिकेतील पीडब्ल्यूसी कंपनीत संचालक पदावर कार्यरत असलेले सीए अभिजीत विधाते यांनी अमेरिकेतील सॅन होजे (कॅलिफोर्निया) येथे गणेशोत्सवानिमित्त गणपतीची प्राणप्रतिष्ठा केली. सलग नऊव्या वर्षी त्यांनी हा उपक्रम राबवून परदेशात गणेशभक्तीचा उत्सव साजरा केला आहे.



अहिल्यानगरचे रहिवासी व अमेरिकेतील पीडब्ल्यूसी कंपनीत संचालक पदावर कार्यरत असलेले सीए अभिजीत विधाते यांनी अमेरिकेतील सॅन होजे (कॅलिफोर्निया) येथे गणेशोत्सवानिमित्त गणपतीची प्राणप्रतिष्ठा केली.

गणेशोत्सव हा भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, भक्ती आणि एकात्मतेचा सण. अमेरिकेतही भारतीय समुदाय मोठ्या उत्साहाने हा सण साजरा करत असतो. यावर्षी विधाते कुटुंबीयांनी गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. आरती, भजन, कीर्तन व सांस्कृतिक उपक्रमांमुळे सॅन होजे परिसरातील भारतीय नागरिक एकत्र येत आहे.

सौ. अंकिता विधाते व कु. अमयरा विधाते यांनी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आकर्षक सजावट केली आहे. लहानग्यांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वच जण सोहळ्यात उत्साहाने सहभागी झाले आहेत.

सीए अभिजीत विधाते हे श्री विशाल गणेश देवस्थान, अहिल्यानगरचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते यांचे पुत्र आहेत. अभिजीत यांना लहानपणापासूनच गणेशभक्तीची प्रेरणा मिळाली असून, तीच परंपरा ते परदेशातही जोपासत आहेत.



जनआरोग्यम संचालित जाणिव फाऊंडेशनतर्फे लोकनेते बाळासाहेब थोरात शिक्षकरत्न पुरस्कार २०२५ संगमनेर येथे महेश पाडेकर यांना प्रदान करण्यात आला.

# महेश पाडेकर यांना राज्यस्तरीय 'शिक्षकरत्न' पुरस्कार प्रदान

नगर – अगस्ती कला वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय अकोले येथील मानसशास्त्र विषयाचे शिक्षक महेश विष्णू पाडेकर यांना जनआरोग्यम संचालित जाणिव फाऊंडेशनतर्फे लोकनेते बाळासाहेब थोरात शिक्षकरत्न पुरस्कार २०२५ संगमनेर येथे प्रदान करण्यात आला.



राज्यातील निवडक शिक्षकांमधून पाडेकर यांची आदर्श शिक्षक म्हणून निवड होऊन हा सन्मान मिळाला.

पाडेकर यांनी अध्यापनाबरोबरच पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती जनजागृती, युवकांचा व्यक्तिमत्त्व विकास, संघटनात्मक नेतृत्व, आदिवासी डोंगराळ भागातील शिक्षकांसाठी एक स्तर वेतन श्रेणी मिळवून देण्याचे काम अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे.

माजी शिक्षण मंत्री व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार सुधीर तांबे, राष्ट्रपती पुरस्कार विजेते कळसकर, अमित पाटणकर, बाळासाहेब हेंद्रे, ज्ञानदेव गायकर आदींच्या हस्ते महेश पाडेकर यांना शिक्षक रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्राथमिक मुख्याध्यापक संघाचे कार्याध्यक्ष विलास सावंत, शिक्षक भारती संघटनेचे कोषाध्यक्ष सोमनाथ बोधले, सोमनाथ रहाणे, संतोष देशमुख, संजय उकिरडे, अर्जुन शेळके आदी उपस्थित होते.

# भटक्या विमुक्तांना हा दिवस अधिकाराविषयी जागरूक करतो

## प्रताप कळसे यांचे प्रतिपादन; भटके विमुक्त दिवस उत्साहात साजरा, लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे वाटप

नगर – १८७१ साली ब्रिटिश सरकारने क्रिमिनल ट्रायब अॅक्ट लागू करून भटक्या समाजावर अन्यायकारी कायदा लादला होता. मात्र, स्वातंत्र्यानंतर ३१ ऑगस्ट १९५२ रोजी शासनाने हा कायदा रद्द केला. त्यानंतर दरवर्षी ३१ ऑगस्ट हा भटके विमुक्त दिवस म्हणून साजरा केला जातो. हा दिवस समाजातील लोकांना त्यांच्या अधिकारांविषयी जागरूक करून देतो आणि सामाजिक न्यायाचा संदेश देतो, असेही नेप्ती मंडळ अधिकारी प्रताप कळसे यांनी स्पष्ट केले.



नेप्ती येथे मंडळ अधिकारी कार्यालय यांच्या वतीने व उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील व तहसीलदार संजय शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली भटके विमुक्त दिवस उत्साहात साजरा करून समाजातील लाभार्थ्यांना जातदाखले, उत्पन्न दाखले आदी विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

नगर तालुक्यातील नेप्ती येथे मंडळ अधिकारी कार्यालय यांच्या वतीने व उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील व तहसीलदार संजय शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली भटके विमुक्त दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी भटक्या-विमुक्त समाजातील लाभार्थ्यांना जातदाखले, उत्पन्न दाखले आदी विविध दाखल्यांचे गावातच वाटप करण्यात आले. शासनाच्या या उपक्रमामुळे लाभार्थ्यांना वेळ, खर्च आणि कार्यालयीन दगदग वाचल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमास नेप्ती गावचे सरपंच संजय जपकर, मंडळ अधिकारी प्रताप कळसे, रामदास फुले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक वसंत पवार, व्हाईस चेअरमन सादिक पवार, सोसायटीचे संचालक जालिंदर शिंदे, सुरेश कदम, महेंद्र चौगुले, भूषण पवार, सचिन पवार, शरद पवार, दत्तू थोरात, नितीन पवार, नेप्ती मंडळातील ग्राम महसूल अधिकारी विनायक दिक्षे, सुवर्णा रांधवण, दीपक झेंडे, श्रीकृष्ण निमसे, रूपाली म्हस्के, दीपाली विधाते, प्रसाद पवार, नैतिक पवार, रोहित गव्हाणे, विशाल चौगुले, रवी पवार, मानव पवार, सम्राट पवार, धनराज पवार, गणेश कर्पे, उपेंद्र कर्पे आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी रामदास फुले म्हणाले की, भटके विमुक्त दिवस साजरा करणे हा एक प्रकारचा कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. या समाजाने स्वातंत्र्यपूर्व काळापासून देशासाठी मोठे योगदान दिले आहे. छत्रपती शिवरायांच्या काळातही या समाजाने स्वराज्यासाठी योगदान दिले. भटक्या विमुक्तांना विविध दाखले देण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन केल्याबद्दल रामदास फुले यांनी ना. अतुल सावे यांचे आभार मानले.

दाखले मिळाल्याने लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. गावातच दाखले उपलब्ध करून दिल्यामुळे अनेकांनी महसूल प्रशासनाचे कौतुक केले. पूर्वी यासाठी तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागे, परंतु आता गावातच सुविधा मिळाल्याने खऱ्या अर्थाने शासन आपल्या दारी हा संकल्प या उपक्रमातून साधला गेला.

# अमेरिकेतील तज्ञ डॉक्टरांचा भारतातील वयोवृद्धांसाठी मोफत उपक्रम

## डॉ. ध्रुती पटेल यांचा वयोवृद्धांना स्वावलंबनाचा मंत्र

नगर – भारत देशात विशेषतः महाराष्ट्र राज्यात दिवसेंदिवस जेष्ठ नागरिकांची संख्या वाढत आहे. अनेक जेष्ठ नागरीकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाकिची आहे, तर काही ज्येष्ठ नागरिक निराधार अवस्थेत जीवन जगत आहेत. वृध्दापकाळात त्यांना विविध शारीरीक व्याधी जडलेले असतात. विशेषतः अशा ज्येष्ठ नागरीकांना निट व व्यवस्थीतपणे उभे राहून चालता यावे यासाठी कोण-कोणत्या उपाय योजना कराव्यात, त्यासाठी करावयाचे व्यायाम आणि या संदर्भात कोणती काळजी घ्यावी, याचे मोफत प्रशिक्षण/ शिक्षण देण्यासाठी अमेरिकेतील डॉक्टर ऑफ फिजिओथेरपि डॉ. ध्रुती पटेल (पी.टी./डि.पी.टी.) यांनी भारतात सेफ स्टेप्स् फाऊटेशन बी स्थापना अलिकडेब केलेली आहे.




अमेरिकेतील डॉ. ध्रुती पटेल यांनी भारतातील वयोवृध्दांसाठी विनामुल्य उपक्रम सुरु केला आहे.

या संस्थेच्या मार्गदर्शकपर सत्राचा प्रारंभ महाराष्ट्रातील अ.नगर जिल्हयातील श्रीरामपूर येथील माऊली वृध्दाश्रम येथे २४ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन अ.नगर शहर सहकारी बँकेचे संचालक अशोक कानडे यांच्या हस्ते दिप प्रज्वलीत करून करण्यात आले.

अमेरिकेतील डॉ. ध्रुती पटेल यांनी भारतातील वयोवृध्दांसाठी सुरू केलेल्या विनामुल्य उपक्रमांचे श्री. कानडे यांनी कौतुक केले.

सी.डी. देशमुख, लॉ कॉलेजचे सचिव ना. म. साठे यांनी वयोवृध्दांच्या कल्याणासाठी स्थापना केलेल्या सेफ स्टेप्स् फाऊंडेशनच्या कामकाजाची रूपरेषा मांडले.



डॉ. ध्रुती पटेल

माऊली वृध्दाश्रम याचे संस्थापक सुभाष वाघुंडे यांनी स्वागत करून अमेरिकेतील डॉ. ध्रुती पटेल यांचे अभिनंदन करून व्हिडीओद्वारे त्यांचे व्याख्यान प्रसारीत केले.

डॉ. ध्रुती पटेल यांनी त्यांच्या अभिभाषणामध्ये सांगितले की, जेष्ठ नागरीकांनी शारीरीकदृष्ट्या आत्म निर्भर व्हावे, यासाठी अमेरिकेत ज्या पध्दतीने त्या विनामुल्य उपक्रम राबवितात, त्याच धर्तीवर भारतातील वयोवृध्दांनी कोणत्या उपाय योजना राबवाव्यात (उदा. व्यायाम, प्रशिक्षण, निरोगी व सदृढ स्वास्थ्यासाठी ज्या गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे, त्याचे विस्तृतपणे विश्लेषण केले. डॉ. ध्रुती पटेल असेही म्हणाल्या की, उपचारापेक्षा स्वतःची काळजी, थोडासा व्यायाम, अधिक तंतोतंत/उपयुक्त माहिती असणे केव्हाही चांगले. जेणे करून संभाव्य दुखापत, आजारपण टाळता येईल. त्यामुळे शेवटी असेही म्हणाल्या की, वृध्दाश्रमातील वयोवृध्दांना सांभाळणार्या व्यवस्थापक व त्यांचे सहकार्यांना प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने माहिती पुस्तके आणि व्हिडीओज् चा विनामुल्य पुरवठा लवकरच केला जाईल.

फाऊंडेशनचे खजिनदार जहिर शेख यांनी आभार मानले.

यावेळी सेफ स्टेप्स् फाऊंटेशनचे संस्थापक मजहर गयास मिर्झा, सचिव आय.जी. मिर्झा व श्रीरामपूर शहरातील रॉयल चॅरिटेबल ट्रस्ट चे पदाधिकारी मुस्ताक शेख, निवृत्त पो.ऊ.नि. इब्राहीम शेख आणि राष्ट्रीय मानवाधिकाराचे हक्काचे संजय वाहुळ उपस्थित होते.



छत्रपती संभाजी महाराज कुस्ती केंद्र येथे जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेचे उदघाटन गुणे आयुर्वेदिक महाविद्यालयाचे अध्यक्ष सचिन जगताप, संपत बारस्कर यांच्या हस्ते झाले. (छाया – लहू दळवी)

# अहिल्यानगर ममहापालिकेच्यावतीने जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा


नगर – भिस्तबाग, पवननगर येथील छत्रपती संभाजी महाराज कुस्ती केंद्र येथे जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन गुणे आयुर्वेदिक महाविद्यालयाचे अध्यक्ष सचिन जगताप, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी उपमहापौर अनिल बोरुडे, माजी स्थायी समिती सभापती गणेश कवडे, अविनाश मोरे, माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, सुनील त्रिंबके, माजी नगरसेविका मीनाताई चव्हाण, पहिलवान शिवाजी चव्हाण, शिवाजी कराळे, पैलवान अंजली वल्लाकट्टी, नितीन आव्हाड, संदीप गायकवाड, अतिश ठाकूर, शंभो यादव, हसन राजे, गोरख रोडे, युवराज चव्हाण, अजित वाघ, प्रसाद गायकवाड, निलेश मदने, क्रीडा अधिकारी फिलिप्स तसेच खेळाडू, शिक्षक उपस्थित होते.

महानगरपालिका हद्दीतील शाळेमधील तब्बल ११५ विद्यार्थ्यांनी विविध वजन गटांमध्ये सहभाग घेतला. यामधील विजयी खेळाडू पुणे विभागीय पातळीवरील स्पर्धेसाठी निवडले गेले असून पुणे, सोलापूर व नगर या जिल्ह्यांतील एकूण सात खेळाडूंमध्ये सामने होणार आहेत. त्यातील विजेता खेळाडू राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरेल. विभागीय स्पर्धेत देखील प्रत्येक गटामध्ये दहा सामने होणार आहेत. कुस्तीगीर संघाच्या वतीने विजेत्या खेळाडूंना सुवर्णपदक तर द्वितीय क्रमांकाच्या खेळाडूंना रौप्यपदक देण्यात आले आहे.

या स्पर्धेसाठी एन. आय. एस. कुस्ती पंच पैलवान मयूर रोहकले, सुनील खोडदे, स्वप्निल भुजबळ व क्रीडा शिक्षक प्रा. आकाश नडे यांनी पंच म्हणून काम केले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी पैलवान संतोष भुजबळ व पैलवान निलेश मदने यांनी सहकार्य केले.

# अर्थजगत

## नोकरी बदल आणि फॉर्म १६




पगारदार करदात्यांसाठी फॉर्म १६ हा आयकर रिटर्न भरण्याच्या दृष्टीने सर्वात महत्वाचा कागदपत्र ठरतो. नियोक्त्याकडून वर्षभरात दिलेल्या पगाराची सविस्तर माहिती आणि त्यावर झालेली करकपात या फॉर्ममध्ये दिलेली असते. त्यामुळे हा दस्तऐवज उत्पन्न आणि कर यांचा अधिकृत पुरावा मानला जातो.

फॉर्म १६ मध्ये दोन भाग असतात. भाग अ आणि भाग ब. भाग अ मध्ये नियोक्ता व कर्मचारी यांची मूलभूत माहिती, पॅन व टॅन क्रमांक, किती टीडीएस वजा झाला आणि तो कोणत्या तारखांना सरकारकडे जमा करण्यात आला याची माहिती असते. भाग ब मध्ये वर्षभरातील एकूण पगार, विविध भत्ते, सवलती, कपाती (उदा. कलम ८०सी, ८०डी) तसेच अंतिम करपात्र उत्पन्न व त्यावरची करदेयता दाखवलेली असते.

या फॉर्ममुळे करदात्याला आपला एकूण पगार किती, त्यावर किती कपात लागू झाली, किती कर आधीच भरला गेला आणि अजून किती बाकी आहे हे सहज लक्षात येते. अनेकदा करदात्याने अतिरिक्त कर भरला असल्यास त्याचा परतावा मिळवण्यासाठी फॉर्म १६ मधील आकडे महत्त्वाची भूमिका बजावतात. उलटपक्षी, कमी कर भरला असल्यास किती कर भरायचा राहिला आहे हे स्पष्ट दिसते.

फॉर्म १६ हे केवळ आयटीआर दाखल करताना उपयुक्त नसून, गृहकर्ज, वाहनकर्ज किंवा अन्य आर्थिक व्यवहारांमध्येही महत्त्वाचा पुरावा म्हणून मागितला जातो. बँका आणि वित्तीय संस्था कर्ज देताना करदात्याची उत्पन्नक्षमता पडताळण्यासाठी या फॉर्मवर विसंबून राहतात.

अनेक करदाते एका वित्तीय वर्षात नोकरी बदलतात. एखाद्या व्यक्तीने एका वर्षात दोन किंवा तीन कंपन्यांत काम केले असेल तर प्रत्येक कंपनी त्याला स्वतंत्र फॉर्म १६ देते. अशावेळी आयकर रिटर्न (आयटीआर) भरताना गोंधळ निर्माण होतो. कारण प्रत्येक नियोक्ता केवळ त्याच्याकडे असलेल्या पगारावर आधारित टीडीएस (स्रोतावर करकपात) वजा करतो. इतर नियोक्त्याकडील उत्पन्नाचा विचार तो करत नाही. त्यामुळे एकूण उत्पन्नावर लागणारा कर आणि प्रत्यक्षात वजा झालेला कर यात तफावत निर्माण होण्याची शक्यता वाढते.

### नोकरी बदलल्यावर काय घडते?

- प्रत्येक नियोक्ता स्वतंत्र फॉर्म १६ देतो.
- प्रत्येक नियोक्ता त्याच्या भागातील पगारावर कर वजा करतो.
- एकत्रित उत्पन्न गृहीत धरलेले नसल्याने करकपात कमी होऊ शकते.
- वर्षाच्या शेवटी खरा कर जास्त निघाल्यास करदात्याला अतिरिक्त कर भरावा लागतो.

**काय करणे आवश्यक आहे?**

- प्रत्येक नियोक्त्याकडून फॉर्म १६ गोळा करावा.
- सर्व पगार एकत्र करून, एकदाच योग्य सवलती आणि कपाती (उदा. कलम ८०सी, ८०डी इ.) वजा कराव्यात.
- दुबार कपात दाखवू नये, अन्यथा कर विभागाकडून नोटीस येऊ शकते.
- फॉर्म २६एएस आणि एआयएस तपासून एकूण टीडीएस आकडे पडताळावेत.
- आवश्यक असल्यास अतिरिक्त कर स्वतः भरावा आणि त्याची नोंद आयटीआरमध्ये करावी.

**संभाव्य समस्या**

- एखाद्या नियोक्त्याचा फॉर्म १६ नोंदवला नाही तर उत्पन्न लपवले असल्याचा संशय येऊ शकतो.
- कमी कर वजा झाल्यामुळे अतिरिक्त करभरणा करावा लागू शकतो.
- चुकीच्या माहितीमुळे दंड किंवा व्याज आकारले जाऊ शकते.


**करदात्यांसाठी मार्गदर्शक टिप्स**

- फक्त शेवटच्या नियोक्त्यावर विसंबून राहू नका.
- फॉर्म १६ उशिरा मिळाला तरी पगाराच्या पावत्यांवरून माहिती घ्या.
- खरी करदेयता काढून पाहा आणि त्यानुसार कर भरा.




> किंमतीच्या आघाडीवरील वाढत्या स्पर्धेमुळे जीवन विमा कंपन्या नॉन-पार्टिसिपेटिंग श्रेणीतील धोका कमी करण्यासाठी पार्टिसिपेटिंग पॉलिसीकडे वळत आहेत. या योजनांची लोकप्रियता लक्षात घेता गुंतवणूकदारांनी त्यांच्या अटींचे अत्यंत काळजीपूर्वक मूल्यमापन करणे आवश्यक ठरते. त्या त्यांच्या आर्थिक उद्दिष्टांच्या दृष्टीने कितपत योग्य आहेत, हे त्यांनी अवश्य पाहणे गरजेचे आहे.

## पार्टिसिपेटिंग पॉलिसी : गुंतवणुकीत संतुलनाचा मार्ग




नॉन-पार्टिसिपेटिंग पॉलिसी या हमी दिलेल्या लाभांसह अंदाजे परतावा निश्चित करून देतात. या पॉलिसी तुलनेने कमी खर्चिक असतात. दुसरीकडे युनिट-लिंक्ड इंश्युरन्स प्लॅन म्हणजे युलिप योजना असतात, ज्या पूर्णपणे बाजाराशी (इक्विटी, डेट किंवा हायब्रिड फंड गुंतवणूक) निगडित असतात. यात परताव्याची कोणतीही हमी नसते आणि गुंतवणुकीवरील संपूर्ण धोका हा पॉलिसीधारकावरच असतो.

पार्टिसिपेटिंग योजना या या दोन श्रेणींच्या मधोमध येतात. या प्रकारच्या योजना काही किमान लाभांची हमी देतात. याशिवाय पॉलिसीधारकाला अंतर्निहित पार्टिसिपेटिंग फंडातून परतावा किंवा नफा देखील मिळतो. यात हमी दिलेल्या घटकामुळे सुरक्षा मिळते, तर बोनसमुळे कालांतराने पॉलिसीचे मूल्य वाढत जाते.

■ जाणून घ्या

शेअर बाजारातील चढउतार आणि व्याजदरातील घसरणीच्या काळात पार्टिसिपेटिंग पॉलिसी या वाढीसोबतच भांडवलाचे संरक्षणही देतात. या पॉलिसींची संतुलित रचना त्यांना वाढीसोबत सुरक्षिततेचा शोध घेणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी आदर्श बनवते. या योजना मध्यम जोखीम क्षमता असणाऱ्यांसाठी योग्य ठरतात.

पार्टिसिपेटिंग फंडाच्या कामगिरीवरच प्रत्यक्षात परतावा अवलंबून असतो. भारतामध्ये सध्याच्या बोनस घोषणांच्या पॅटर्नच्या आधारे पार्टिसिपेटिंग पॉलिसी या १५ ते २० वर्षांच्या अवधीत ५ ते ७ टक्के परतावा दर देतात.

यामध्ये बोनसची घोषणा फंडाच्या कामगिरीच्या आधारावर दरवर्षी केली जाते. तथापि बोनस निश्चित नसतो. परतावा अनिश्चित असतो कारण तो बीमाकंपनीच्या कामगिरीवर अवलंबून असतो आणि त्याची हमी दिलेली नसते. त्यामुळे पॉलिसीधारकांना खूप वेळानंतरच पॉलिसीचे खरे मूल्य समजते.

पार्टिसिपेटिंग योजनांसाठी प्रीमियम हा नॉन-पार्टिसिपेटिंग योजनांच्या तुलनेत अधिक असतो. यात तरलता (लिक्विडिटी) मर्यादित असते आणि या पॉलिसी लवकर सरेंडर केल्यास मूल्याचे नुकसान होते.

पार्टिसिपेटिंग पॉलिसी या पारंपरिक गुंतवणूकदारांसाठी उपयुक्त असतात. ही पॉलिसी मुलांच्या शिक्षणासाठी, वारसाहक्कासाठी किंवा निवृत्तीसाठी बचत करणाऱ्या कुटुंबांसाठी चांगला पर्याय आहे. कारण हे गुंतवणूकदार काही वर्षांसाठी नव्हे तर दशकेभरासाठी वचनबद्ध असतात.

पार्टिसिपेटिंग पॉलिसी घेण्यापूर्वी विमा कंपनीच्या दाव्यांच्या रेकॉर्डची, आर्थिक ताकदीची आणि किमान दहा वर्षांपेक्षा जास्त काळाच्या बोनस रेकॉर्डची तपासणी करणे आवश्यक आहे. सरेंडरच्या अटी काळजीपूर्वक पाहाव्यात. पॉलिसी दस्तावेज पूर्णपणे वाचावा आणि बोनस नियमांबाबत स्पष्टता मिळवावी. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पॉलिसी आपल्या उद्दिष्टांशी कितपत जुळते हे पाहणे आवश्यक आहे.

## स्टॉक एसआयपीच्या अंतरंगात...

गेल्या काही वर्षांत भारतीय गुंतवणूकदारांमध्ये एसआयपी (सिस्टेमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन) या संकल्पनेला प्रचंड लोकप्रियता मिळाली आहे. सामान्यतः लोक एसआयपी म्हटले की ते फक्त म्युच्युअल फंडाशी जोडतात. मात्र आता थेट शेअर बाजारात देखील स्टॉक एसआयपी अशी एक सुविधा उपलब्ध आहे. या माध्यमातून एखाद्या निवडक कंपनीचा शेअर थोड्या-थोड्या हप्त्यांत विकत घेण्याची संधी मिळते. त्यामुळे एकदम मोठी रक्कम गुंतवावी लागत नाही आणि वेळोवेळी जमा होत गेलेले शेअर्स भविष्यात चांगले परतावे देऊ शकतात.




स्टॉक एसआयपीची संकल्पना

स्टॉक एसआयपी म्हणजे एखाद्या गुंतवणूकदाराने एखाद्या ठरावीक शेअरमध्ये दर महिन्याला, दर पंधरवड्याला किंवा ठरलेल्या कालावधीत निश्चित रक्कम गुंतवणे. उदाहरणार्थ, आपण ठरवले की टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) या कंपनीचा शेअर प्रत्येक महिन्याला ५००० रुपयांच्या प्रमाणात विकत घ्यायचा. तर शेअरचा भाव जास्त असेल तर त्या महिन्यात कमी शेअर्स मिळतील, भाव कमी असेल तर जास्त शेअर्स मिळतील. अशा प्रकारे दीर्घकाळात रुपया-खर्च सरासरीकरण (रुपी कॉस्ट ॲव्हरेजिंग) घडते आणि गुंतवणुकीचा धोका थोड्या प्रमाणात कमी होतो.

■ गुंतवणूक

समजा एखाद्या गुंतवणूकदाराने इन्फोसिस या शेअरमध्ये दर महिन्याला २००० रुपये गुंतवण्याचा निर्णय घेतला.

जानेवारी महिन्यात इन्फोसिसचा भाव होता २००० रुपये. त्यामुळे त्या महिन्यात फक्त १ शेअर विकत मिळाला.

फेब्रुवारीत भाव कमी होऊन १६०० रुपये झाला. त्यामुळे त्या महिन्यात १ शेअर व उरलेल्या ४०० रुपयांत अर्धा शेअर मिळाला (अनेक प्लॅटफॉर्मवर अपूर्ण शेअर खरेदीची सुविधा असते).

मार्चमध्ये भाव २५०० रुपयांवर गेला. त्यामुळे त्या महिन्यात फक्त ०.८ शेअर मिळाला.

अशा प्रकारे हळूहळू गुंतवणूकदाराकडे शेअर्सचा संच जमा होत गेला. पाच वर्षांनंतर किंवा दहा वर्षांनंतर कंपनीने दिलेल्या लाभांशासह (डिव्हिडंड) आणि भाववाढीसह ही गुंतवणूक मोठी रक्कम बनू शकते.

**फायदे** : १. रुपया-खर्च सरासरीकरणाचा लाभ दर महिन्याला ठराविक रक्कम गुंतवल्याने भाव जास्त असताना कमी शेअर्स, भाव कमी असताना जास्त शेअर्स मिळतात. यामुळे सरासरी खरेदी किंमत संतुलित राहते.

- शिस्तबद्ध गुंतवणूक शेअर बाजारात वारंवार निर्णय घेणे कठीण असते. मात्र स्टॉक एसआयपीमध्ये ठराविक तारखेला गुंतवणूक आपोआप होत राहते. यामुळे दीर्घकालीन शिस्त तयार होते.
- मोठ्या भांडवलाची गरज नाही एकदम मोठी रक्कम गुंतवण्याऐवजी हप्त्यांमध्ये गुंतवणूक करता येते. मध्यमवर्गीय गुंतवणूकदारासाठी ही सोय उपयुक्त ठरते.
- **दीर्घकालीन संपत्ती निर्मिती ः** उत्तम गुणवत्तेच्या कंपन्या निवडून त्यामध्ये नियमित गुंतवणूक केली तर भविष्यात चांगली संपत्ती निर्माण होऊ शकते.

### जोखीम

- **कंपनी-विशिष्ट धोका ः** जर निवडलेली कंपनी दीर्घकालीन दृष्टीने चांगली कामगिरी करू शकली नाही, तर स्टॉक एसआयपीचे परतावे खूपच कमी होऊ शकतात.
- **भाववाढीचा धोका ः** काही वेळा शेअरचा भाव सातत्याने वाढत राहतो. अशा वेळी सुरुवातीच्या गुंतवणुकीत जास्त शेअर्स मिळत असले तरी पुढे कमी शेअर्स मिळतात.
- **म्युच्युअल फंडाएवढा विविधीकरणाचा लाभ नाही ः** म्युच्युअल फंडात अनेक शेअर्समध्ये गुंतवणूक होत असल्याने धोका विभागला जातो. मात्र स्टॉक एसआयपीमध्ये एका किंवा फारतर दोन-तीन कंपन्यांपुरतेच धोरण मर्यादित राहते.
- **बाजारातील अस्थिरता :ः** अल्पकालीन काळात मोठ्या चढउतारांना सामोरे जावे लागते. संयम न ठेवल्यास नुकसान होऊ शकते. स्टॉक एसआयपी हा गुंतवणुकीचा एक आकर्षक पर्याय आहे. योग्य कंपनींची निवड करून सातत्याने गुंतवणूक केली, तर दीर्घकालीन काळात भरघोस संपत्ती उभी राहू शकते. मात्र या प्रकारात धोका जास्त असल्यामुळे गुंतवणूक करण्यापूर्वी कंपनीची आर्थिक स्थिती, कामगिरी, भविष्यातील संधी आणि उद्योगक्षेत्राची अवस्था यांचा अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. यासोबतच आपल्या आर्थिक उद्दिष्टांनुसार आणि जोखीम सहन करण्याच्या क्षमतेनुसारच स्टॉक एसआयपी सुरू करावा.

## ‘डीअँडओ’ विमा पॉलिसी म्हणजे काय?




स्टार्टअप असो किंवा लहान मोठी कंपनी असो किंवा मोठे कॉर्पोरेट घराणे असो या कंपनीत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना काहीवेळा उद्योग समूह चालवताना अडचणी येतात. प्रसंगी कंपनीचे अधिकारी प्रामुख्याने गुंतवणुकदार, व्यवस्थापकीय संचालक, सीईओ किंवा अन्य अधिकाऱ्यांना गंभीर आरोपांचा, खटल्याचा सामना देखील करावा लागतो. अशावेळी खटल्यात कंपनीची बाजू मांडण्यासाठी बराच खर्च उचलावा लागतो. मात्र डीअँडओ पॉलिसी असेल तर कंपनीच्या अधिकाऱ्यांना, संचालकांना आर्थिक झळ बसत नाही आणि ते खटल्याचा खर्च वहन करतात.

एखाद्या कंपनीवरच्या खटल्यासाठी सर्वच अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा किंवा दुर्लक्षपणा कारणीभूत असतो असे नाही. एखाद्या अधिकाऱ्याची चूकही बरीच महागात पडू शकते आणि त्यामुळे कंपनीला खटल्याला सामोरे जावे लागते. अशावेळी खटल्यात पाण्यासारखा पैसा करावा लागतो. न्यायालयाचा निकाल विरोधात गेला तर भरपाईपोटी मोठी रक्कम भरावी लागते.

■ विमाजगत

कंपनीच्या अधिकाऱ्यांची हीच अडचण लक्षात घेता विमा कंपन्यांनी विशेष विमा योजना आणली असून ती कंपनीचे अधिकारी किंवा संचालकांना विमा कवच देण्याचे काम करते. ही पॉलिसी डी अँड ओ म्हणजेच डायरेक्टर्स अँड ऑफिसर्स इन्शुरन्स पॉलिसी नावाने ओळखली जाते.

या पॉलिसीचे महत्त्व पाहता मोठे किंवा संस्थात्मक गुंतवणूकदार देखील अशा प्रकारचा विमा उतरविणाऱ्या अधिकारी आणि संचालकांच्या कंपनीत पैसे टाकण्याबाबत सजग असतात. कोणत्या ना कोणत्या कारणाने कंपनी अडचणीत आल्यास आणि अधिकाऱ्यावर खटला दाखल केला तर विमा पॉलिसी अधिकाऱ्यांना विविध प्रकारच्या खटल्यापासून सुरक्षा प्रदान करेल आणि कंपनीचे अस्तित्व देखील धोक्यात सापडणार नाही.

**डी अँड ओ विमा योजना**

डी अँड ओ म्हणजेच डायरेक्टर्स अँड ऑफिसर्स विमा योजना ही संचालक आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांच्या कामाशी सबंधित कायदेशीर खटला, आरोप किंवा दाव्याला आर्थिक सुरक्षा प्रदान करण्याचे काम करते.

कंपनी किंवा अधिकाऱ्याचा एखादा निर्णय हा चुक ठरत असेल, निष्काळजीपणा वाटत असेल किंवा नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप होत असेल आणि या कारणावरून न्यायालय किंवा नियामक संस्थेत खटला दाखल होत असेल तर ही विमा योजना संबंधितात कायदेशीर खर्च, नुकसान आणि तडजोडीच्या रक्कमेला सुरक्षा कवच प्रदान करते. शिवाय भागधारक, कर्मचारी किंवा प्राधिकरण किंवा थर्ड पार्टी कंपनी ही अन्य कंपनीवर खटला दाखल करते तेव्हा ही योजना महत्त्वाची ठरतो. या योजनेमुळे कंपनी आणि त्यांच्या अधिकाऱ्यांचे व्यक्तिगत किंवा व्यावसायिक शेअर भांडवल सुरक्षित राहते.

**कोणत्या जोखमीला कवच?**

डी अँड ओ श्रेणीतील विमा योजनेत अनेक प्रकारच्या जोखमींना सुरक्षा कवच दिले जाते. यात कंपनी आणि त्याच्या भागधारकांसाठी बांधील असलेल्या नियमांचे कथित उल्लंघन केल्याप्रकरणी केले जाणारे दावे, कंपनीच्या भागधारकांनी संचालक आणि अधिकाऱ्यां विरोधात केलेल्या आरोपावरून केलेली कायदेशीर कारवाई उदा. ढिसाळ कारभाराचा आरोप, चांगली कामगिरी करण्यात अपयश आल्याचा दावा, चुकीच्या किंवा भ्रामक आर्थिक अहवालाचा ठपका यासंदर्भात दाखल होणाऱ्या दाव्यांचा यात समावेश असतो. याशिवाय बेकायदा उत्पन्न, सार्वजनिक पातळीवर जारी केलेल्या निवेदनात विसंगती आढळून येणे यासंदर्भातील आरोपावरून केलेल्या दाव्यांला विमा कवच मिळते.

## रशियाकडून तेलखरेदीचा ताळेबंद



भारताने रशियाकडून स्वस्त खनिज तेल खरेदी करून बराच लाभ करून घेतला असल्याचा आरोप केला जात आहे. काही संस्थांनी जारी केलेल्या आकडेवारीनुसार भारताला यामुळे १० ते २५ अब्ज डॉलरचा फायदा झाला असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्षामध्ये भारताला या स्वस्त तेल खरेदीतून केवळ २.५ अब्ज डॉलरचा लाभ झाला असल्याची माहिती एका अभ्यास अहवालात नमूद करण्यात आली आहे.

सीएलएसएया ब्रोकरेज संस्थेने या संदर्भात ही माहिती जारी केली आहे. या संस्थेने म्हटले आहे, की प्रत्यक्षात २.५ अब्ज डॉलरचा लाभ झाला आहे. ही रक्कम भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ ०.६ टक्के इतकी आहे.

रशिया -युक्रेन युद्ध सुरू होण्यापूर्वी भारत आपल्या एकूण गरजेच्या केवळ एक टक्के खनिज तेल रशियाकडून खरेदी करत होता. युद्ध सुरू झाल्यानंतर हे प्रमाण वाढून काही काळ ४०% पर्यंत गेले होते, हे खरे आहे. मात्र रशिया भारताला जेवढा डिस्काउंट देतो असे दावे केले जात आहेत तेवढा डिस्काउंट भारताला मिळत नाही. यामुळे नफ्याचे आकडे फुगवून सांगितले जात असल्याचे दिसून येते.

बऱ्याच युरोपियन देशांनी रशियाकडून खनिज तेल खरेदी बंद केली असली तरी नैसर्गिक वायूची खरदी चालूच ठेवली होती. यामुळे रशियाकडे अतिरिक्त खनिज तेल उपलब्ध होते. भारताने त्यावेळी योग्य दरावर हे तेल खरेदी केले आहे. मात्र ट्रम्प प्रशासनाने भारताने या आयातीतून नफेखोरी केला असल्याचा आरोप वेळोवेळी केला आहे. भारताने हे खनिज तेल खरेदी करताना कोणत्याही आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग केलेला नाही. मुळात अमेरिकेने किंवा युरोपने रशियन खनिज तेल किंवा या खनिज तेलापासून तयार केलेले पदार्थ खरेदी करण्यास बंदी घातलेली नव्हती. उलट याच देशांनी भारताने तयार केलेल्या पेट्रोल आणि डिझेलचे आयात केली असल्याच्या बाबीकडे लक्ष वेधण्यात आले.

जागतिक खनिज तेलाच्या किमती वाढू नयेत म्हणून अमेरिकेच्या तत्कालीन प्रशासनानेच भारताला खनिज तेल खरेदी करण्याची सूचना केली होती असे बोलले जाते. मात्र याला दुजोरा मिळालेला नाही. जर भारताने रशियाचे खनिज तेल खरेदी केले नसते तर भारताला पर्यायी स्त्रोतातून खनिज तेल खरेदी करावे लागले असते.

अशा अवस्थेत जागतिक खनिज तेल बाजारात खनिज तेलाच्या किमती १०० डॉलरपेक्षा जास्त झाल्या असत्या. याचा फक्त भारतीय अर्थव्यवस्थेवरच नाही तर जगातील इतर खनिज तेल आयात करणार्‍या देशांच्या अर्थव्यवस्थेवरही परिणाम झाला असता असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. भारताने याच कालावधीत सौदी अरेबिया, इराक आणि अमेरिकेकडूनही खनिज तेल खरेदी केले आहे.

## टर्म इन्शुरन्स घेण्यास विलंब तोट्याचाच !

सध्याच्या अस्थिर आणि ताणतणावाच्या जगात कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी टर्म इन्शुरन्स महत्त्वाचा ठरत आहे. अनेकांना याचे महत्त्व पटते; पण त्याबाबतचा निर्णय घेण्यास टाळाटाळ केली जाते. पण मंडळी हा विलंब तुमच्यासाठी कसा महागात पडू शकतो, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.

आयुष्याच्या सुरुवातीला टर्म इन्शुरन्स घेतल्यास केवळ आर्थिक संरक्षणच लवकर मिळत नाही, तर प्रीमियमवरही मोठी बचत करता येते. विमा क्षेत्रातील आकडेवारीनुसार, टर्म इन्शुरन्स घेण्यास होणारा विलंब तुमचा दरमहा होणारा खर्च वाढवतो आणि हा भार दीर्घकाळपर्यंत टिकतो.

याचे कारण टर्म इन्शुरन्सचा प्रीमियम थेट व्यक्तीच्या वयावर अवलंबून असतो. वय जितके वाढते तितका विमा कंपनीसाठी धोका जास्त असल्यामुळे प्रीमियमही वाढतो. उदाहरणार्थ, धूम्रपान न करणाऱ्या एका ३० वर्षांच्या पुरुषाने ३० वर्षांच्या कालावधीसाठी १ कोटी रुपयांचा टर्म इन्शुरन्स घेतला तर त्याच्या प्रीमियममध्ये प्रचंड फरक दिसून येतो.



वयाच्या २५ व्या वर्षी हा प्रीमियम जवळपास ६९९ रुपये प्रतिमहिना एवढा असतो. पण ३० वर्षांच्या वयात तोच प्रीमियम ८८१ ते १,०८८ रुपये प्रतिमहिना इतका होतो आणि ३५ वर्षांच्या वयात तो आणखी वाढून १,३०७ ते १,५२७ रुपये प्रतिमहिना इतका पोहोचतो.

आयसीआयसीआय प्रुडेंशियलच्या आय-प्रोटेक्ट स्मार्ट प्लस या योजनेत ३० वर्षांच्या व्यक्तीसाठी प्रीमियम ९७२ रुपये प्रतिमहिना आहे, तर ३५ वर्षांच्या वयात तोच प्रीमियम १,४२६ रुपयांपर्यंत वाढतो. म्हणजेच केवळ पाच वर्षांच्या विलंबामुळे तब्बल ४७ टक्क्यांची वाढ होते.

विमा तज्ज्ञांच्या मते, वीस वर्षे वयाच्या व्यक्तीसाठी असणारा टर्म इन्शुरन्सचा हप्ता दरवर्षी साधारण तीन ते चार टक्क्यांनी वाढतो. मात्र तिशी नंतर, विशेषतः ३५ ते ४० वर्षांच्या कालावधीत, हा वाढीचा दर सहा ते आठ टक्क्यांपर्यंत पोहोचतो.

वय जसजसे वाढते, तसतसे आरोग्याच्या समस्या, मृत्यूची शक्यता आणि इतर धोकेही वाढतात. त्यामुळे विमा कंपन्यांना त्याचा विचार करून प्रीमियम महाग करावा लागतो.

वयाशिवाय इतर घटकांनाही प्रीमियम ठरवताना महत्त्व दिले जाते. धूम्रपान करणाऱ्यांचे प्रीमियम सरासरी दीडपट जास्त असतात. शरीराचे वजन, रक्तदाब, कोलेस्टेरॉल, मधुमेह, कौटुंबिक आरोग्य इतिहास या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात.

याशिवाय व्यक्तीचे काम, जीवनशैली आणि छंद यावरही प्रीमियम अवलंबून असतो. जोखमीच्या कामांमध्ये गुंतलेल्या किंवा धोकादायक छंद असलेल्या लोकांचे प्रीमियम अधिक असतात, तर स्त्रियांना आणि धूम्रपान न करणाऱ्यांना तुलनेने कमी प्रीमियम आकारला जातो.

२५ व्या वर्षी आणि ३५ व्या वर्षी टर्म इन्शुरन्स घेण्यामध्ये मोठा फरक दिसून येतो. उदाहरणार्थ, २५ व्या वर्षी टर्म इन्शुरन्स घेतल्यास साधारणपणे ७४० रुपये प्रतिमहिना हप्ता द्यावा लागतो. एकूण ३० वर्षांत २.६६ लाख रुपये विमा उतरवणाऱ्या व्यक्तीला भरावे लागतात. पण जर हाच विमा ३५ वर्षांच्या वयात घेतला, तर प्रीमियम १,४२६ रुपये प्रतिमहिना इतका वाढतो आणि ३० वर्षांत एकूण ५.१३ लाख रुपये द्यावे लागतात. म्हणजेच केवळ दहा वर्षे उशीर केल्यामुळे तुम्हाला तब्बल २.४७ लाख रुपये जास्त खर्च करावे लागतात.

म्हणूनच टर्म इन्शुरन्स घेण्यात विलंब करणे हे दीर्घकाळासाठी तुमच्या आर्थिक योजनेसाठी हानिकारक ठरते.त्यामुळे शक्य तितक्या लवकर टर्म इन्शुरन्स घेतल्यास तुमचे प्रीमियम कमी राहतात आणि तुम्हाला आयुष्यभर पुरेशी आर्थिक सुरक्षा मिळते.

# पारंपरिक वाद्यांच्या गजरात गौरी-गणपतीची रंगली मिरवणूक

### महिलांच्या उत्स्फूर्त सहभागाने वेधले लक्ष, महालक्ष्मी मातेच्या जयघोषाने दुमदुमले नगर

नगर – गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ३१ ऑगस्ट रोजी रेल्वे स्टेशन परिसरात गौरी-गणपतीचे आगमन मोठ्या उत्साहात झाले. परंपरेप्रमाणे महिलांनी व युवतींनी एकत्र येऊन पारंपरिक वाद्यांच्या गजरात भव्य मिरवणुकीचे आयोजन केले होते. आडत व्यापारी गणेश लालबागे परिवार तसेच नातेवाईक व आप्तेष्टांच्या वतीने ही मिरवणूक काढण्यात आली होती. मिरवणुकीला मल्हार चौक येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातून प्रारंभ झाला. पारंपारिक वेशभूषेत सजलेल्या महिलांनी गौरी-गणपतींचे मुखवटे घेऊन सहभागी होत, वाद्यांच्या ठेक्यावर फुगड्यांचा फेर धरला होता. यावेळी ढोल, ताशा, झांजांच्या गजरात महालक्ष्मी मातेचा जयघोष करण्यात आला. गौरी-गणपती बाप्पा मोरया... च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. या मिरवणुकीतून परंपरा, स्त्रीशक्तीचा जागर करण्यात आला.



रेल्वे स्टेशन परिसरात गौरी-गणपतीचे आगमन मोठ्या उत्साहात झाले. परंपरेप्रमाणे महिलांनी व युवतींनी एकत्र येऊन पारंपरिक वाद्यांच्या गजरात भव्य मिरवणुकीचे आयोजन केले होते.

या मिरवणुकीत मोनिका गणेश लालबागे, प्रतिभा साखरे, नंदा नवले, तनु साखरे, नेहा लालबागे, प्रिया लालबागे, सायली मेहेत्रे, रेवती भुतारे, आरती लोंढे, रूपाली भुतारे, धनश्री गुजर, रचना पवार, सुवर्णा आगरकर, सविता मेहेत्रे, निक्षीता भुतारे, पूजा चौधरी, शीतल चिपाडे, छाया लालबागे, राणी लालबागे, दीपा चिपाडे, वैशाली पुंड, मोहिनी शिंदे, छाया कानडे यांच्यासह परिसरातील महिला, युवती व युवक उत्साहाने सहभागी झाले होते. महिलांचा उत्स्फूर्त सहभाग हा मिरवणुकीचा खास आकर्षणबिंदू ठरला.

मिरवणुकीचे मार्गक्रमण होत असताना ठिकठिकाणी भाविक व स्थानिक नागरिकांनी गौरी-गणपतींचे स्वागत केले. मिरवणुकीत सहभागी मुखवट्यांचे पूजनही करण्यात आले. फटाक्यांच्या आतषबाजीत रेल्वे स्टेशन परिसरातून मार्गक्रमण करत आनंदनगर येथे मिरवणुकीचा समारोप झाला. मिरवणुकीनंतर लालबागे परिवाराच्या वतीने गौरी-गणपतींची आकर्षक सजावट करून स्थापना करण्यात आली. फुलांनी, रंगीबेरंगी कापडांनी आणि दिव्यांच्या रोषणाईने विविध वस्तू व खाद्य पदार्थांनी गौरी गणपती पुढे सजावट करण्यात आली होती. सोन्याच्या पावलांनी आलेल्या गौरी-गणपतींनी घराघरांत मंगलमय वातावरण निर्माण केल्याची भावना महिलांनी व्यक्त केली.



**दगडूशेठ गणपतीसमोर ३५ हजार २१५ महिलांचे अथर्वशीर्ष पठण उपक्रमाची ग्लोबल बुक ऑफ एक्सलेंसमध्ये नोंद**

३५ हजार २१५ महिलांनी ऋषिपंचमीनिमित्त दगडूशेठ गणपतीसमोर अथर्वशीर्ष पठण केले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. याची नोंद ग्लोबल बुक ऑफ एक्सलन्स, इंग्लंड मध्ये करण्यात आली. वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र ग्लोबल बुक ऑफ एक्सलन्स, इंग्लंड उपाध्यक्ष डॉ. दीपक हरके यांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेशराव सूर्यवंशी यांना प्रदान केले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या अंतर्गत सुरू असलेल्या करिअर कॅम्पस, अहिल्यानगर येथे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण घेतलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार व निरोप समारंभ उत्साहात झाला.

## बार्टीच्या स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण घेतलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार व निरोप समारंभ

नगर – डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या अंतर्गत सुरू असलेल्या करिअर कॅम्पस, अहिल्यानगर येथे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण घेतलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार व निरोप समारंभ उत्साहात झाला.

करिअर कॅम्पसच्या माध्यमातून बँकिंग, एस.एस.सी., रेल्वे तसेच विविध शासकीय सेवांसाठी सातत्याने प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणाचा लाभ घेत या बॅच मधून आतापर्यंत एकूण आठ विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करून शासकीय सेवेत दाखल झाले आहेत. या यशामुळे करियर कॅम्पसचे योगदान अधोरेखित झाले असून, भविष्यात आणखी विद्यार्थी कठोर परिश्रम व गुणवत्तापूर्ण मार्गदर्शनाच्या जोरावर शासकीय सेवेत स्थान मिळवतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ कार्यकर्ते शेत्रे उपस्थित होते. तसेच करिअर कॅम्पसचे संचालक व अध्यापक सुशांत भगत उपस्थित होते. यावेळी यशस्वी विद्यार्थांचा भारतीय संविधानाची प्रत व मोमेंटो देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात यशस्वी विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. बार्टीतर्फे मिळालेल्या आर्थिक सहाय्यामुळे तसेच गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणामुळेच आम्हाला गावातून शहरात येऊन स्पर्धा परीक्षांची तयारी करता आली. त्यातूनच आम्ही आज सरकारी सेवेत दाखल होऊ शकलो, असे मनोगत सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. तसेच, शिक्षकांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनामुळे अल्पावधीतच यश मिळाल्याचेही त्यांनी सांगितले.

## अहिल्यानगर जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी संघाच्या जिल्हाध्यक्षपदी ज्ञानेश्वर सुर्वे यांची निवड



नगर – ग्रामपंचायत अधिकारी संघ राज्य अध्यक्ष तात्यासाहेब पाटील (कोल्हापूर) यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत अधिकारी संघाच्या जिल्हा अध्यक्षपदाची निवड प्रक्रिया अहिल्यानगर येथे २३ ऑगस्ट रोजी नियमानुसार पार पडली. सदर निवड प्रक्रियेत अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व तालुकाध्यक्ष तालुका सचिव तसेच छत्रपती शिवाजी राजे ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्थेचे सर्व संचालक तसेच आजी माजी पदाधिकारी व राज्य कार्यकारणी पदाधिकारी, माजी राज्याध्यक्ष विजय मस्कर अण्णा, राज्याचे सरचिटणीस एस. डी. पाटील आणि माजी राज्य सरचिटणीस किरूळकर आदी सदस्य उपस्थित होते.

यावेळी सर्वानुमते ग्रामपंचायत अधिकारी संघाचे जिल्हाध्यक्ष म्हणून ज्ञानेश्वर सुर्वे यांची निवड झाल्याचे राज्य अध्यक्ष तात्यासाहेब पाटील यांनी घोषित केले.

## १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर – एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याची घटना नगर तालुक्यातील वाकोडी फाटा परिसरात घडली. यासंदर्भात मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीची मुलगी हिला ३० ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता ते दुपारी २.१५ वाजताच्या दरम्यान तिच्या गावातून कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेले. घटनेची माहिती फिर्यादीला मिळाल्यानंतर त्यांनी मुलीचा सर्वत्र शोध घेतला असता ती मिळून आली नाही. त्यांनी रात्री उशिरा भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली असून तपास सुरू केला आहे.

## दुचाकी व मोबाईलची चोरी

नगर – एमआयडीसी परिसरातील एल अ‍ॅण्ड टी कंपनीच्या गेट नंबर ४ जवळ चोरट्यांनी एक दुचाकी व तिच्या डिक्कीतील मोबाईल चोरून नेला आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत श्याम बापू कोकडे (वय २०, रा. वडगाव गुप्ता, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांची दुचाकी (एमएच १६ बीएस ७०६३) व दुचाकीच्या डिकीत ठेवलेला मोबाईल २८ ऑगस्ट रोजी रात्री १० वाजल्यापासून ते २९ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात चोरट्याने चोरून नेला. कोकडे यांनी ३० ऑगस्ट रोजी एमआयडीसी पोलिसांना माहिती दिली. त्यावरून पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## मांजरसुंबा-पिंपळगाव माळवी-हिंगणगाव रस्त्याची दुरुस्ती करा

नगर – मांजरसुंबा, डोंगरगण, वांबोरी, पिंपळगाव माळवी, वडगाव गुप्ता, नव नागापूर व एमआयडीसी या गावांमधील नागरिकांच्या दळणवळणासाठी मांजरसुंबा-पिंपळगाव माळवी-विळद-हिंगणगाव हा १७२ क्रमांकाचा रस्ता हा एकमेव मार्ग असून सध्या या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. सदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गवत, झाडेझुडपे व काटेरी कुंपण वाढल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. तसेच रस्त्यावर ठिकठिकाणी खोल खड्डे पडल्याने अपघातांचा धोका वाढला आहे. त्यामुळे या रस्त्याची तातडीने साफसफाई करून खड्ड्यांवर पॅचिंगचे काम करण्यात यावे, अशी मागणी शिव प्रहार संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.



मांजरसुंबा-पिंपळगाव माळवी-हिंगणगाव रस्त्याची दुरुस्ती करण्याच्या मागणीचे निवेदन शिव प्रहार संघटनेतर्फे सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आले.

या संदर्भात शिव प्रहार संघटनेचे युवक तालुका अध्यक्ष गोरक्षनाथ आढाव यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले यावेळी दत्तात्रय झिने, विनायक झिने, आदिनाथ झिने, शिवाजी आढाव, बंडू झिने, सहदेव खोसे, कैलास लहारे, गोरक्षनाथ झिने आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.







खेळांविषयी जागृती निर्माण व्हावी व क्रीडा संस्कृती वृद्धिंगत व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शहरात विविध खेळांचे प्रात्यक्षिक सादर करत रॅली काढण्यात आली.


**ग्रामपंचायत वेळापूर, ता.कोपरगांव, जि.अहिल्यानगर**
**जाहीर निविदा**

ग्रामपंचायत वेळापूर, ता.कोपरगाव, जि.अहिल्यानगर येथील खालील कामाचे नोंदणीकृत ठेकेदार, पुरवठादार यांचेकडून सीलबंद बी -१ निविदा दरपत्रके मागविणेत येत आहे.

| कामाचे नाव | योजनेचे नाव | ठेकेदाराचा वर्ग | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| मौजे वेळापूर येथे नविन विहीर घेणे | १५ वा वित्त आयोग सन २०२४-२५ | सुबेअ | ६,१९,९६५/- |

* काम पूर्ण करण्याचा कालावधी - ३ महिने

**अटी व शर्ती** :- १) निविदा फॉर्म माहिती पत्रक दि. ०१/०९/२०२५ ते ०८/०९/२०२५ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) बी-१ निविदा दि.०९/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. ३) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे. **निविदेसोबत** - १) जि. प.नोंदणी २) जी.एस.टी ३) पॅन कार्ड ४) अनुभवाचा दाखला

**ग्रामसेवक /सरपंच**
वेळापूर, ता.कोपरगाव जि.अहिल्यानगर

**ग्रामपंचायत चासनळी, ता.कोपरगांव, जि.अहिल्यानगर**
**जाहीर निविदा**

ग्रामपंचायत चासनळी ता.कोपरगाव, जि.अहिल्यानगर येथील खालील कामाचे नोंदणीकृत ठेकेदार, पुरवठादार यांचेकडून सीलबंद बी -१ निविदा दरपत्रके मागविणेत येत आहे.

| कामाचे नाव | योजनेचे नाव | ठेकेदाराचा वर्ग | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| मौजे चासनळी येथील गावअंतर्गत भूमिगत पाईपलाईन गटार करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५-२६ | सुबेअ | ५ लक्ष |
| मौजे चासनळी येथील गावअंतर्गत भूमिगत पाईपलाईन गटार करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५-२६ | खुला | १,५०,००० |
| मौजे चासनळी येथील कचराडेपो चैनलिंक कंपाऊंड करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२४-२५ | खुला | ५ लक्ष |
| मौजे चासनळी येथे अरुण कुंभारकर घर ते सुनील पगारे घर गटार दुरुस्ती करणे | ग्रामनिधी सन २०२५-२६ | सुबेअ | १,४०,०००/- |

* काम पूर्ण करण्याचा कालावधी - ३ महिने

**अटी व शर्ती** :- १) निविदा फॉर्म माहिती पत्रक दि. ०१/०९/२०२५ ते ०८/०९/२०२५ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) बी-१ निविदा दि.०९/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. ३) निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे. **निविदेसोबत** - १) जि. प.नोंदणी २) जी.एस.टी ३) पॅन कार्ड ४) अनुभवाचा दाखला

**ग्रामसेवक /सरपंच**
चासनळी ता.कोपरगाव जि.अहिल्यानगर


# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शहरात रंगली क्रीडा रॅली

### मल्लखांब, तलवारबाजी, एरियल एरोबिक्सच्या प्रात्यक्षिकांनी जिंकली मने, ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक व प्रशिक्षकांचा गौरव

नगर – खेळांविषयी जागृती निर्माण व्हावी व क्रीडा संस्कृती वृद्धिंगत व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शहरात विविध खेळांचे प्रात्यक्षिक सादर करत २९ ऑगस्ट रोजी रॅली काढण्यात आली. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद अहिल्यानगर, जिल्हा ऑलंपिक संघटना, एकविध खेळ संघटना, क्रीडा मंडळे यांच्या संयुक्त विद्यमाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध खेळाचे एक हजारपेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली या रॅलीचे नियोजन करण्यात आले होते.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्ते जुने बस स्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराज आणि ऑलंपिकवीर मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन तसेच झेंडा दाखवून या रॅलीचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी जि.प. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संध्या गायकवाड, उपशिक्षणाधिकारी दरेकर, कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे, संतोष वाबळे, प्रवीण कोंढावळे, क्रीडा अधिकारी प्रियांका खिंडरे, सागर पवार, मीना पाचपुते, साक्षी दळवी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते निर्मलचंद्र थोरात, सुनील जाधव, मनिषा पुंडे, अंजली देवकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी खांब मल्लखांब आणि रोप मल्लखांब यावर चित्तथरारक असे प्रात्यक्षिक खेळाडूंनी सादर केले. मुलींनी सादर केलेल्या एरियल एरोबिक्सने उपस्थितांच्या हृदयाचा ठोका चुकविला. खेळाडूंनी मर्दानी खेळाचे प्रात्यक्षिक सादर करून सर्वांचे लक्ष वेधले. रिमझिम बरसलेल्या पावसाच्या सरीत नगरकरांना लाठी-काठी, तलवारबाजी, दांडपट्टा आदी युध्दकलेचे प्रात्यक्षिक अनुभवयास मिळाले. तसेच रॅलीत हॉकी, बॉक्सिंग, स्केटिंग, फुटबॉल, हॉलीबॉल, कराटे, तलवारबाजी, आर्चरी, क्रिकेट आदी खेळांचे चौका-चौकात प्रात्यक्षिक झाले. रॅली पाहण्यासाठी नागरिकांनी देखील मोठी गर्दी केली होती. या रॅलीत लेझीम, झांज व ढोल पथकाने उत्साहपूर्ण वातावरण निर्माण करून रंगत आणली होती. एक घंटा, खेळ के मैदान मे!..., हर गली, हर मैदान, खेलेंगा हिंदुस्तान... या घोषणा देत रॅली रंगली होती.

ही रॅली माळीवाडा, पंचवीर चावडी, माणिक चौक, कापड बाजार, तेलीखुंट, नेता सुभाष चौक, चितळे रोड, चौपाटी कारंजा व जुन्या कोर्टाच्या मागच्या बाजूने वाडियापार्क क्रीडा संकुल येथे या रॅलीचा समारोप झाला. समारोपीय कार्यक्रमात रोप मल्लखांब व खांब मल्लखांब चे प्रात्यक्षिक रंगले होते. मल्लखांबावर हातात तलवार घेऊन आणि तोंडातून आग ओकणाऱ्या प्रसंगाने उपस्थितांची मने जिंकली. याप्रसंगी विविध सांस्कृतिक कार्यक्रम देखील रंगले होते.

प्रास्ताविकात जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे म्हणाले की, हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांचा वाढदिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा होत आहे. खेळाचा प्रचार-प्रसार होण्याच्या उद्देशाने ही रॅली काढण्यात आलेली आहे. पुढील ओलंपिकचे लक्ष केंद्रीत करुन स्वतंत्र क्रीडा धोरण राबविण्यात आलेले असून, सर्व खेळाला व खेळाडूंना प्रोत्साहन दिले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले की, निरोगी जीवनासाठी भारताने संपूर्ण जगाला योगा दिला आहे. सध्या भारतात लाइफ स्टाईल बदलल्याने अनेक आजारांना सामना नागरिकांना करावा लागत आहे. निरोगी जीवनासाठी मैदानी खेळाची गरज असून, यासाठी जागृती होण्याची आवश्यकता आहे. खेळातून सशक्त व सदृढ समाज निर्माण होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पोलीस निरीक्षक प्रताप दराडे म्हणाले की, सरकारी नोकरीसह प्रत्येक क्षेत्र हा एक खेळ असून, तेथे खेळाडूवृत्तीने टिकावे लागते. सर्वांचा समतोल साधून व सांघिक भावनेने पुढे जावे लागते. खेळात संयम व सातत्य आवश्यक आहे. खेळात प्रामाणिक योगदान दिल्यास यश निश्चित आहे. युवकांनी व्यसनापासून तर खेळाडूंनी नव्याने आलेल्या सप्लीमेंट आणि विविध कृत्रिम गोष्टींपासून लांब राहण्याचे आवाहन केले.

या रॅलीत महाराष्ट्र ऑलंपिक असोसिएशन अहिल्यानगर विभागाचे सचिव शैलेश गवळी, महाराष्ट्र सायकलिंग असोसिएशनचे सचिव संजय साठे, अहिल्यानगर मल्लखांब संघटनेचे नंदेश शिंदे, निलेश कुलकर्णी, राजकुमार धोत्रे, अनंत रीसे, मोहिनीराज लहाडे, शंभूसूर्य मर्दानी प्रशिक्षण संस्थेचे बबलू टेकाळे, अमोल निमोणकर, योगा संघटनेचे सचिव उमेश झोटिंग, प्रशिक्षिका प्रणिता तरोटे, जलतरण संघटनेचे रावसाहेब बाबर, टेनिस क्रिकेट संघटनेचे अविनाश काळे, ज्युदो संघटनेचे संजय धोपावकर, हॉकी संघटनेचे आसिफ शेख, फुटबॉल संघटनेचे अभिषेक सोनावणे, खालिद सय्यद, प्रदीप जाधव, मनीष राठोड, तायक्वांदो संघटनेचे अल्ताफ कडकाले, महेश आनंदकर, फेन्सिंग संघटनेचे सुनील गोडाळकर, बॅडमिंटन संघटनेचे मल्हार कुलकर्णी, बॉक्सिंग संघटनेचे शकील सय्यद, रायफल शुटींग संघटनेचे अलीम शेख, कुस्ती संघटनेचे निलेश मदने, बास्केटबॉल संघटनेचे सचिन भापकर, कबड्डी संघटनेचे विनायक भुतकर, अमोल धानापूर्ण, धनुर्विद्या संघटनेचे अमित शिंदे, रोलबॉल संघटनेचे प्रदीप पाटोळे, प्रशांत पाटोळे, रोलर स्केटिंग संघटनेचे सतीश गायकवाड, पॉवर लिफ्टिंग संघटनेचे डेविड मकासरे, अहिल्यानगर बुद्धिबळ संघटनेचे यशवंत बापट, मैदानी संघटनेचे अमित चव्हाण, विश्वेशा मिस्किन, एरोबिक्स संघटनेच्या सुरय्या खैरनार, सिलंबम संघटनेचे डॉ. झिया शेख, किक बॉक्सिंग संघटनेचे सचिन मकासरे, राजमुद्रा करिअर अ‍ॅकॅडमीचे अनिकेत सर, नगरी स्ट्रायकरचे संदिप दातीर, प्रारंभ फिजिकल क्लबचे ज्ञानेश्वर अटक, एम.एस. फिजिकल क्लबचे मोहन शेलार, शिवरक्षक अ‍ॅकॅडमीचे संभाजी महाडिक, शिवदल अ‍ॅकॅडमीचे पवार, शंभूसूर्य मल्लखांबचे बबलू टेकाळे आदींसह सनफार्मा हायस्कूल, ग. ज. चिंबर विद्यालय व रेसिडेन्शियल हायस्कूलचे लेझीम पथक, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे झांज पथक, रुपीभाई बोरा न्यू इंग्लिश स्कूलचे ढोल पथक सहभागी झाले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शैलेश गवळी व रावसाहेब बाबर यांनी केले. भाऊराव वीर यांनी आभार मानले.

### ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक व प्रशिक्षकांचा गौरव

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या हस्ते क्रीडा क्षेत्रातील ज्येष्ठ मार्गदर्शक तथा प्रशिक्षक रावसाहेब बाबर, संजय धोपावकर, होनाजी गोडळकर, अनिल म्हस्के, सुरेश बनसोडे, संजय इस्सार आणि माजी जिल्हा क्रीडा अधिकारी अजय पवार यांचा विशेष गौरव करण्यात आला.

